सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १० मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३३० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव

**मुंबई:** भारतीय क्रिकेट संघानं २०२६ च्या आयसीसी पुरुष टी-२०विश्र्वचषक स्पर्धेत शानदार कामगिरी केली. अहमदाबाद इथं झालेल्या अंतिम सामन्यात टीम इंडियानं न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करुन तिसऱ्यांदा टी-२० विश्र्वचषक जिंकला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विजयाबद्दल टीम इंडियाचं अभिनंदन केलं. यासह टीम इंडियावर सर्व स्तरावरुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही संघाचे अभिनंदन केले आहे.

### पत्रकारांसाठीही महामंडळ

**मुंबई :** पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी सरकारने जाहीर केलेले आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची कार्यवाही पुढील अधिवेशनाच्या आत करण्यात येईल, तसेच पत्रकारांच्या विविध विषयांवर पत्रकार संघटना, शासनातील विविध विभाग, संबंधित लोकप्रतिनिधी यांची एक व्यापक बैठक लवकरच घेण्यात येईल, अशी ग्वाही मंत्री अशी शेलार यांनी सोमवारी (९ मार्च) विधान परिषदेत दिली. आमदार श्रीकांत भारतीय यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित करून पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले.

### नवीन ऑटोरिक्षाना परवाना नाही

**मुंबई :** वाढती वाहतूक कोंडी रोखणे व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी ९ मार्चपासून राज्यभर नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्यात येत आहे, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. तथापि, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर नवीन परवाने द्यावेत,या संदर्भात निर्णय घेतला जाईल, त्यानूसार पुढील निर्णय घेतला जाणार आहे.अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्रातील ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य सरकारकडे असल्याचे स्पष्ट करत भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने महाराष्ट्र शासनाला याबाबत स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे.

### दूतावासाचे स्पष्टीकरण

**रियाध :** मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्र्वभूमीवर सौदी अरेबियात झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्याबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. अल-खर्ज परिसरातील एका निवासी इमारतीवर क्षेपणास्त्र पडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाल्याची चर्चा होती; मात्र भारतीय दूतावासाने ही माहिती चुकीची असल्याचे स्पष्ट केले आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणविरोधात कारवाई सुरू केल्यानंतर गेल्या काही दिवसांत संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. या पार्श्र्वभूमीवर इराणकडून कतार, बहरीन, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीतील अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

### आता येणार आयफोन १८

**मुंबई :** ींश्रिश ळझहेपश १७श नंतर आता -ींश्रिश च्या पुढील फ्लॅगशिप स्मार्टफोन्सची चर्चा सुरू झाली आहे. कंपनी लवकरच -ींश्रिश ळझहेपश १८ झी बाजारात लवकरच आणणार आहे. लॉन्चला अजून वेळ असला तरी काही रिपोर्ट्समधून या फोनच्या डिझाइन, कॅमेरा, बॅटरी आणि हार्डवेअरबद्दल काही माहिती समोर आली आहे रिपोर्टनुसार, यावेळी सर्वात मोठा बदल फोनच्या फ्रंट डिझाइनमध्ये दिसू शकतो. ऋरलश खऊ साठी लागणारे सेन्सर आणि हार्डवेअर डिस्प्लेच्या खाली बसवले जाऊ शकतात. जर असे झाले तर ळझहेपश मध्ये सध्या दिसणारा ऊूपराळल खीश्ररपव हटवला जाऊ शकतो.त्याऐवजी सेल्फी कॅमेरा स्क्रीनच्या वर डाव्या बाजूला छोट्या होल-पंच स्वरूपात दिसू शकतो. त्यामुळे स्क्रीन अधिक स्वच्छ आणि मोठी वाटेल.

### मिस इंडियाने पुन: हिंदू

**पुणे :** 'मिस इंडिया अर्थ २०१९' किताब जिंकलेली सायली सुर्वे सध्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. सायली सुर्वे ही मराठी आणि मूळची पुण्याची परंतु तिने आतिफ या इसमाची २०१९ मध्ये घरच्यांचा विरोधात जाऊन प्रेमविवाह केला. आतिफ याच्याशी प्रेमविवाहानंतर तिच्यावर जबरदस्तीने तिच्यावर धर्मांतरासाठी दबाव टाकण्यात आला आणि तिला मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागला, असा आरोप तिने केला. सायलीने कुटुंबाच्या विरोधात जाऊन मीरा-भाईंदरमधील व्यावसायिक आतिफ तासे याच्याशी लग्न केले होते.

# भारताचा शेषनाग १५० ड्रोन, नवं घातक शस्त्र

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धामुळे ड्रोनचे महत्त्व आणखी वाढले आहे. याआधी रशिया - युक्रेन लढाईत दोन्ही देशांनी तसेच ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने पाकिस्तान विरोधात ड्रोनचा शस्त्राप्रमाणे प्रभावी वापर केला. आता भारत शेषनाग १५० नावाच्या नव्या अतिशय प्रभावी आणि संहारक ड्रोनच्या निर्मितीत गुंतला आहे.**

पश्चिम आशियातील युद्धात इराण मोजके पैसे खर्चून तयार केलेले ड्रोन हे बॉम्ब प्रमाणे इस्त्रायल तसेच अमेरिकेविरोधात वापरत आहेत. हे ड्रोन आकाराने लहान आणि वेगवान असल्यामुळे निकामी करणे कठीण आहे. अमेरिका आणि इस्त्रायल जी आधुनिक क्षेपणास्त्र विरोधी क्षेपणास्त्र प्रणाली वापरतात, त्याने हे ड्रोन निकामी करता येतात. पण अवघ्या काही हजारांचा ड्रोन नष्ट करण्यासाठी लाखो रुपये खर्चून तयारी केलेली महागडी क्षेपणास्त्र वापरली जात आहेत. शिवाय इराणी ड्रोनचा मोठा ताफा आला तर ती सर्व ड्रोन निकामी करणे कठीण जाते आणि किमान काही ड्रोन शत्रूचे नुकसान करण्यात यशस्वी होत आहेत. या घडामोडींचा अभ्यास करून भारताने स्वतःच्या नव्याने विकसित होत असलेल्या ड्रोनमध्ये आवश्यक ते बदल केले आहेत. यामुळे भारतीय ड्रोन अतिशय प्रभावी आणि संहारक झाले आहेत. भारताच्या शेषनाग १५० या ड्रोनची ऑपरेशनल रेंज एक हजार किमी. पेक्षा जास्त आहे. यामुळे हे ड्रोन एकदा उड्डाण केल्यानंतर लांबचा प्रवास सहज करू शकतात. सलग पाच तास आकाशात कार्यरत राहण्याची क्षमता या ड्रोनमध्ये आहे. निश्र्चित केलेल्या लक्ष्यावर घिरट्या घालत अथवा लांबून लक्ष ठेवणे, रिअल टाइम पाळत ठेवणे हे काम शेषनाग १५० ड्रोन सहज करू शकतात. तसेच हे ड्रोन २० ते ४० किलो स्फोटके वाहून नेऊ शकतात. विशिष्ट लक्ष्यावर स्फोटके टाकणे अथवा स्फोटकांसह लक्ष्यावर जाऊन आदळणे असेही हा ड्रोन करू शकतो. एकाचवेळी हजारो शेषनाग १५० ड्रोनचा ताफा विशिष्ट परिसरावर हल्ला करण्यासाठी प्रक्षेपित करण्यासाठी चाचण्या सुरू असल्याचे सूत्रांकडून समजते.




## राज्यातील Ola, Uber आणि Rapid बाइक टॅक्सी चालकांना मोठा धक्का; सरकारने परवाने केले रद्द

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०९ मार्च :** पश्र्चिम महाराष्ट्रासह संपूर्ण राज्यात लोकप्रिय असलेल्या बाइक टॅक्सी सेवांना मोठा धक्का बसला आहे. महाराष्ट्र सरकारने कडक कारवाई करत ओला, उबर आणि रॅपिडो कंपन्यांच्या बाइक टॅक्सी सेवांवर तात्पुरती बंदी घातली आहे. राज्य सरकारने या कंपन्यांना देण्यात आलेले अस्थायी परवाने तत्काळ रद्द केले असून त्यामुळे सध्या महाराष्ट्रात या कंपन्यांची बाइक टॅक्सी सेवा बंद झाली आहे.

सरकारच्या माहितीनुसार, या कंपन्यांना राज्यात बाइक टॅक्सी चालवण्याची परवानगी देताना फक्त इलेक्ट्रिक बाइक वापरण्याची अट घालण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर पेट्रोलवर चालणाऱ्या बाइक टॅक्सी सुरू केल्याचा आरोप आहे. हा नियमभंग मानून सरकारने ही कारवाई केल्याचे सांगितले आहे.

मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले की, कंपन्यांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी आधीच एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. मात्र त्या कालावधीतही कंपन्यांनी पूर्ण कागदपत्रे सादर केली नाहीत. त्यामुळे सरकारने कठोर पाऊल उचलत त्यांचे अस्थायी परवाने रद्द केले. तरीही कंपन्यांना आणखी एक महिन्याची अंतिम मुदत देण्यात आली आहे. या कालावधीत नियमांचे पालन आणि आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास त्यांचे परवाने कायमचे रद्द केले जाऊ शकतात.

महाराष्ट्र सरकारने सुरुवातीला पर्यावरणपूरक वाहतूक वाढवण्यासाठी आणि स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी ई-बाइक टॅक्सी सेवांना परवानगी दिली होती. मात्र कंपन्यांनी या अटींचे पालन केले नसल्याचे सरकारचे म्हणणे आहे. इलेक्ट्रिक बाइकऐवजी पेट्रोल बाइकचा वापर सुरूच ठेवल्यामुळे सरकारने ही कारवाई केल्याचे सांगितले आहे.

सरकारच्या नव्या आदेशानुसार, राज्यात कुठेही पेट्रोलवर चालणारी बाइक टॅक्सी आढळल्यास चालकासह बाइक मालकावरही गुन्हा दाखल केला जाईल. तसेच संबंधित बाइक जप्त करण्याचीही कारवाई करण्यात येणार आहे.

## अनिल अंबानींवर फसवणुकीचा नवा गुन्हा दाखल; सीबीआयची कारवाई

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय तपास ब्युरो (सीबीआय) ने अनिल अंबानी आणि त्यांच्या कंपनी रिलायन्स कम्युनिकेशन्स (आरकॉम) च्या इतर संचालकांविरुद्ध फसवणुकीचा नवा गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) च्या तक्रारीवरून करण्यात आली असून २०१३ ते २०१७ या कालावधीत बँकेसोबत सुमारे १,०८५ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० (फसवणूक) आणि १२०बी (गुन्हेगारी कट) अंतर्गत एफआयआर नोंदवण्यात आला आहे.

पीएनबीचे व्यवस्थापक संतोषकृष्ण अन्नवरपु यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, अनिल अंबानी आणि कंपनीच्या इतर संचालकांनी बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्या निधीचा कथित गैरवापर केला. एफआयआरमध्ये नमूद केल्याप्रमाणे, या प्रकरणात पीएनबीला सुमारे ६२१.३९ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, तर युनायटेड बँक ऑफ इंडिया (जिचे नंतर पीएनबीमध्ये विलीनीकरण झाले) ला ४६३.८० कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. बँकेच्या म्हणण्यानुसार, कंपनीने घेतलेले कर्ज अशा ठिकाणी गुंतवले किंवा वळवले ज्याची माहिती बँकेला देण्यात आली नव्हती. दरम्यान, यापूर्वी फेब्रुवारी महिन्यातही सीबीआयने अनिल अंबानी आणि रिलायन्स कम्युनिकेशन्सविरोधात आणखी एका बँक फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल केला होता. त्या प्रकरणात २०१३ ते २०१७ या काळात बँक ऑफ बडोदा सोबत २,२२० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक झाल्याचा आरोप तपास यंत्रणांनी केला आहे.

याच प्रकरणांच्या पार्श्र्वभूमीवर प्रवर्तन निदेशालय (ईडी) ने अनिल अंबानी यांच्या अनेक मालमत्तांवर जप्तीची कारवाई केली आहे. मुंबईतील त्यांचा 'एबोड' नावाचा आलिशान बंगला जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजित किंमत सुमारे ३,७१६ कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. तसेच दिल्ली, नोएडा, गाझियाबाद, मुंबई, पुणे, ठाणे, हैदराबाद, चेन्नई, कांचीपुरम आणि पूर्व गोदावरी या शहरांमध्ये असलेल्या निवासी घरे, कार्यालयीन जागा आणि जमिनींचाही यात समावेश आहे.मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत करण्यात आलेल्या या कारवाईत आतापर्यंत सुमारे १५ हजार कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. रिलायन्स कम्युनिकेशन्सद्वारे झालेल्या कथित बँक फसवणुकीच्या प्रकरणात अनिल अंबानी यांच्यावर एकूण सुमारे ४० हजार कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराचा तपास सुरू असल्याचे तपास यंत्रणांनी सांगितले आहे.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते भारतातील सर्वात मोठा एकात्मिक फॉस्फेटिक खत उत्पादन प्रकल्प राष्ट्रास समर्पित

**पारादीप (ओडिशा)/ वृत्तसंस्था :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते इंडियन फार्मर्स फर्टिलायझर को-ऑपरेटिव्ह लिमिटेड (IFFCO) च्या पारादीप संकुलातील नव्याने उभारण्यात आलेला सल्फ्युरिक ॲसिड प्लांट-३ राष्ट्राला समर्पित करण्यात आला. सुमारे ७०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीत उभारण्यात आलेल्या या प्रकल्पाची दैनंदिन उत्पादन क्षमता सुमारे २ हजार मेट्रिक टन असून त्यामुळे देशातील खत उत्पादन पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळणार आहे.



या प्रकल्पामुळे पारादीप संकुलाची कार्यक्षमता वाढणार असून ते भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक फॉस्फेटिक खत उत्पादन केंद्रांपैकी एक म्हणून अधिक सक्षम होणार आहे. कार्यक्रमाला ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी, केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान, IFFCO चे अध्यक्ष दिलीप संघाणी, व्यवस्थापकीय संचालक के. जे. पटेल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अमित शाह यांनी सहकार क्षेत्राचे ग्रामीण अर्थव्यवस्थेत असलेले महत्त्व अधोरेखित करताना खत्रन्नउज सारख्या संस्थांनी देशातील लाखो शेतकऱ्यांना सक्षम केले असल्याचे सांगितले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून खत उत्पादन क्षमता वाढविल्यास शेतकऱ्यांना आवश्यक घटक वेळेवर उपलब्ध होतील, असेही त्यांनी नमूद केले.

नव्या प्रकल्पामुळे खत पुरवठा साखळी अधिक मजबूत होऊन शेतकऱ्यांना खतांची उपलब्धता सुधारेल तसेच आत्मनिर्भर भारत संकल्पनेलाही बळकटी मिळेल, असा विश्र्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

## बोर्डाच्या परीक्षेसाठी एआयचा वापर करून शिक्षकांनीच पुरवल्या कॉपी; तब्बल ८१ शिक्षक निलंबित

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०९ मार्च :** महाराष्ट्रात दहावी-बारावीच्या बोर्ड परीक्षेदरम्यान एआय तंत्रज्ञानाचा गैरवापर करून कॉपी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात सहभागी असल्याचे आढळल्यानंतर राज्यातील तब्बल ८१ शिक्षकांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे.




महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा यांनी दिलेल्या माहितीनुसार, परीक्षेदरम्यान काही ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्ता चा वापर करून उत्तरं मिळवली जात होती. यासाठी विशेषतः ChatGPT सारख्या साधनांचा वापर करून कॉपी केल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणात बीड जिल्ह्यात सर्वाधिक कारवाई करण्यात आली. बीडमधील चौसाळा परीक्षा केंद्रात अनेक शिक्षक यात सहभागी असल्याचे तपासात उघड झाले. काही ठिकाणी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी संगनमत केले होते. तंत्रज्ञानाच्या मदतीने उत्तरं पुरवली जात होती.

मंडळाने केलेल्या प्राथमिक चौकशीनंतर संबंधित शिक्षकांना निलंबित करण्यात आले असून या प्रकरणात पुढील शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता आहे. परीक्षेची पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर थांबवण्यासाठी मंडळाने ही कठोर कारवाई केल्याचे सांगितले आहे.

## सावधान! पृथ्वीच्या वाढत्या उष्णतेने बिघडली भारतातील ऋतूंची गती!

### देशातील बहुतांश ठिकाणी हिवाळ्यातील किमान तापमानातील वाढ चिंताजनक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** विविध ऋतूचक्रांनी नटलेला देश अशी भारताची पारंपारिक ओळख आहे. ऋतू बदलावरच आपल्याकडे अनेक सण आणि उत्सव साजरे केले जातात. आता हेच ऋतूचक्र पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पृथ्वीच्या वाढत्या उष्णतेमुळे निसर्गाची हक्काची लय हरवत चालली आहे, अशी धोक्याची सूचना 'विज्ञान आणि पर्यावरण केंद्र' आणि 'डाउन टू अर्थ' यांच्या नवीन रिपोर्टने दिली आहे.

हवामान विभाग आणि सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माहितीचा अभ्यास करून 'विज्ञान आणि पर्यावरण केंद्राने एक अहवाल तयार केला आहे. २०१२ ते सप्टेंबर २०२५ या सुमारे १,५०० दिवसांमधील हवामानातील बदलांचा एक नकाशातून अतिशय धक्कादायक गोष्ट समोर आली आहे.

भारतामध्ये उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे ऋतू स्पष्टपणे वेगळे जाणवायचे; पण आता पृथ्वीच्या वाढत्या उष्णतेमुळे निसर्गाची हक्काची लय हरवत चालली आहे. हे ऋतू एकमेकांत मिसळले आहेत. म्हणजेच, कधीही पाऊस पडतोय तर कधी ऐन हिवाळ्यात उन्हाळा जाणवतोय.

'विज्ञान आणि पर्यावरण केंद्राने एक अहवालातील आकडेवारीवरून असे दिसून येते की, २०२५ वर्षातील पहिल्या नऊ महिन्यांत (जानेवारी ते सप्टेंबर) देशात सुमारे ९९ टक्के दिवस अतिवृष्टीचा अनुभव आला. या २७३ दिवसांपैकी, असा एकही दिवस नव्हता जेव्हा भारताच्या काही भागात अतिवृष्टी, उष्णतेची लाट, गारपीट किंवा चक्रीवादळ यासारख्या आपत्तीचा तडाखा बसला नसेल. गेल्या चार वर्षांत भारतात प्रथमच जवळजवळ संपूर्ण वर्षभर



अतिवृष्टीच्या घटनांची नोंद झाली आहे. २०२३ मध्ये फक्त सहा राज्यांमध्ये अशा घटना घडल्या, तर २०२५ मध्ये देशभरातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश प्रभावित झाले. जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये ५९ पैकी ५७ दिवस अतिवृष्टीच्या घटना नोंदवल्या गेल्या.

ऋतू बदलाचा आणखी एक पुरावा म्हणजे कडक हिवाळ्यातही देशाच्या काही भागात उष्णतेच्या लाटा अनुभवल्या गेल्या. मान्सून आता केवळ पावसाळीच नाही तर तीव्र उष्णता आणि उष्णतेच्या लाटा देखील अनुभवत आहेत. नोव्हेंबरपर्यंत पडणाऱ्या पावसामुळे संपूर्ण खरीप आणि रब्बी पिकांच्या कापणीत व्यत्यय आला आहे.

हवामान बदलामुळे भारताचा नैसर्गिक नकाशाच बदलू लागला आहे. पूर्वी १० वर्षांतून एखादी मोठी नैसर्गिक आपत्ती येत असेल. मात्र आता राजस्थान आणि लेह सारख्या वाळवंटी भागात आता पूर येत आहेत, तर हिमालय आणि इतर डोंगराळ भागांत आता वर्षभर खूप उष्णता जाणवते. यामुळे हिमनद्या वेगाने वितळत असून तिथल्या निसर्गाचा समतोल बिघडत चालला आहे.

### ऋतूचक्राच्या अस्तित्वालाच आव्हान

मानवी इतिहासात कधीही नव्हती इतकी घातक वायूंचीपातळी आज पृथ्वीच्या वातावरणात वाढली आहे. आताच कठोर पावले उचलली नाहीत, तर आपल्या प्रगतीचा आधार असलेले 'ऋतूचक्र' कायमचे नष्ट होऊ शकते, असा इशाराही या अहवालात देण्यात आला आहे.

### सार्वजनिक जीवनासह अर्थव्यवस्थेवर परिणाम

हवामानातील हे बदल आता केवळ कागदावर किंवा आकडेवारीपुरते राहिलेले नाहीत, तर आपल्या दैनंदिन जगण्यावर त्याचा थेट परिणाम होत आहे. अवकाळी पावसामुळे शेतकरी आता जूनमध्ये पेरणी करायला घाबरत आहेत. कधी पाऊस उशिरा येतो, तर कधी तयार झालेले पीक अवकाळी पावसामुळे मातीमोल होत असल्याचे वास्तव आहे. उन्हाचा चटका इतका वाढला आहे की, मार्च महिना संपण्यापूर्वीच अनेक ठिकाणी शाळांना सुट्ट्या द्याव्या लागत आहेत.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### 'बेस्ट इन शो' पुरस्कारासह सन्मानित

**छत्रपती संभाजीनगर :** सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कं. लि.ने आज घोषणा केली की, गॅलेक्सी एस२६ अल्ट्राला स्पेनमधील बार्सिलोनामध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोबाइल वर्ल्ड काँग्रेस (एमडब्ल्यूसी)दरम्यान ग्लोबल मोबाइल अवॉर्ड्स (ग्लोमो अवॉर्ड्स)मध्ये 'बेस्ट इन शो' पुरस्कारसह सन्मानित करण्यात आले. ग्लोबल मोबाइल कम्युनिकेशन्स असोसिएशन (जीएसएमए) दरवर्षी एमडब्ल्यूसीदरम्यान ग्लोमो अवॉर्ड्सचे आयोजन करते, जेथे मोबाइल उद्योगामधील उल्लेखनीय नाविन्यतांना प्रशंसित केले जाते. 'बेस्ट इन शो' श्रेणी ग्राहक-केंद्रित उत्पादनांना प्रशंसित करते, जे तंत्रज्ञानासाठी मापदंड स्थापित करतात. उद्योगामधील सर्वोच्च सन्मान 'बेस्ट इन शो' मिळणारे डिवाईसेस डिजिटल क्षेत्रात 'सुवर्ण मानक' (गोल्ड स्टॅण्डर्ड) म्हणून ओळखले जातात, ज्यांचे जगातील २०० हून अधिक आघाडीचे स्वतंत्र विश्लेषक, पत्रकार आणि उद्योगामधील दिग्गजांकडून परीक्षण केले जाते.

### आईकू ज़ेड ११ एक्स लॉन्चसाठी सज्ज

**नवी दिल्ली :** हाय-परफॉर्मन्स स्मार्टफोन ब्रँड आईकू १२ मार्च रोजी आईकू ज़ेड११एक्स हा नवीन स्मार्टफोन लॉन्च करण्यासाठी सज्ज आहे. हा स्मार्टफोन विशेषतः अशा विद्यार्थ्यांसाठी डिझाइन करण्यात आला आहे जे शिक्षण, मनोरंजन आणि आपल्या ध्येयांचा समतोल राखत वेगवान जीवनशैली जगतात. आईकू ज़ेड११एक्स दमदार परफॉर्मन्स आणि शक्तिशाली बॅटरीसह येतो, जो दीर्घकाळ अखंड वापरासाठी तयार करण्यात आला आहे.

### गणेश कार्तिकेय मध्ये भगवान शिव तांडव

सोनी सब वरील पौराणिक गाथा 'गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय' आता आपल्या कथानकाच्या सर्वात तीव्र टप्प्यात पोहोचली आहे. देवी सती आणि भगवान शिव यांच्या प्रवासातील भावनिक वळणानंतर कथा एका निर्णायक क्षणी येते, जिथे दु:खाचे रूपांतर दिव्य क्रोधात होते. या ट्रॅकचा मुख्य आकर्षण म्हणजे भगवान शिवांचा प्रचंड तांडव, जो अभिनेता अविनेश रेखी साकारत आहे. भव्य दृश्ये आणि अध्यात्मिक गहनतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या या शोमध्ये आता एक असा क्षण दाखवला जात आहे जो भावनिकदृष्ट्या जड आणि दृश्यदृष्ट्या विस्फोटक आहे. हे पडद्यावर आणण्यासाठी अविनेशला शारीरिक आणि भावनिक तयारी करावी लागली.


### इक़बाल खान 'व्हील ऑफ फॉर्च्यून' मध्ये

सोनी सब वरील आगामी शो 'यादें' बद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे कारण या शोचा लीड अभिनेता इक्बाल खान नुकताच व्हील ऑफ फॉर्च्यून या गेम शोमध्ये खास पाहुणा म्हणून झळकला. हा शो बॉलिवूड सुपरस्टार अक्षय कुमार होस्ट करत असून, इक्बालसोबत त्याचे मित्र आणि लोकप्रिय कलाकार मनीष पॉल व करण वाहीही सहभागी झाले. त्यांच्या उपस्थितीमुळे हा एपिसोड हास्याने भरलेला आणि प्रेक्षकांसाठी संस्मरणीय ठरला.

### अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या सचिवपदी प्रा. मधुसूदन मुळे यांची नियुक्ती

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०९ मार्च :** येथील सामाजिक कार्यकर्ते व ब्राह्मण समाजातील ज्येष्ठ नागरिक प्रा. मधुसूदन मुळे यांची अखिल तीन वर्षांसाठी भारतीय ब्राह्मण महासंघाच्या सचिवपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी या आशयाचे पत्र प्रा. मुळे यांना नुकतेच दिले आहे.



अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वाढीसाठी तसेच या महासंघाकडून नगरमध्ये मोठे उपक्रम घेण्याच्या दृष्टीने आपण आपल्या सचिवपदाच्या कार्यकाळात प्रामाणिकपणे प्रयत्न करू, असे नियुक्तीनंतर बोलताना प्रा. मुळे यांनी सांगितले.

# जागतिक महिला दिनानिमित्त 'द केरला स्टोरी २' चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग

## लायन्स क्लब ऑफ क्लासिक द वन तर्फे आयोजन

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०९ मार्च :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्त्री शक्तीचा जागर करण्यासाठी आणि सामाजिक विषयांवर जनजागृती करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये एका विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील नामांकित गोल्डी चित्रपटगृहात विविध महिला गट आणि सामाजिक संस्थांमधील महिलांनी एकत्र येत 'द केरला स्टोरी २' हा चित्रपट पाहिला.

या विशेष चित्रपट प्रदर्शनाचे आयोजन 'लायन्स क्लब ऑफ क्लासिक द वन' तर्फे करण्यात आले होते. केवळ मनोरंजन हा हेतू न ठेवता, समाजात घडणाऱ्या घडामोडींबाबत महिलांना सतर्क करणे आणि त्यांच्यात जागृती निर्माण करणे, हा होता.

चित्रपट सुरू होण्यापूर्वी लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधला. महिला दिनानिमित्त महिलांच्या सुरक्षिततेचा आणि सक्षमीकरणाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून अशा प्रकारचे चित्रपट पाहणे काळाची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले. गोल्डी चित्रपटगृहाचा परिसर महिलांच्या गर्दीने फुलून गेला होता. चित्रपट पाहिल्यानंतर अनेक महिलांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, असे वास्तववादी चित्रपट पाहिल्यामुळे समाजात वावरताना कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी, याची अधिक स्पष्टता मिळते.

या संपूर्ण प्रकल्पाचे यशस्वी नियोजन प्रकल्प प्रमुख लायन डॉ. अश्विनी जयस्वाल आणि इव्हेंट को-ऑर्डिनेटर लायन मासूम सवाईवाला यांनी केले. लायन्स क्लब ऑफ क्लासिक द वनच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये अध्यक्ष लायन आशिष जयस्वाल, सचिव लायन डॉ. बालाजी बिरादार, कोषाध्यक्ष लायन अभिषेक राज, प्रथम उपाध्यक्ष लायन तेजस यादव, तसेच लायन पूर्वा जयस्वाल, लायन नागेश आणि भाग्यश्री गोटे यांचा सक्रिय सहभाग होता.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनेक दानशूर व्यक्तींनी प्रायोजक



म्हणून सहकार्य केले. यामध्ये भवानी जयस्वाल, लायन महारुद्र विघ्ने, लायन स्मिता जयस्वाल, लायन डॉ. ज्योती शेवगण, नारायण सुरे आणि लायन सुनील देसरडा यांचा समावेश होता. त्यांच्या सहकार्यामुळेच ३०० हून अधिक महिलांना या चित्रपटाचा विनामूल्य लाभ घेता आला. या उपक्रमामुळे शहरातील महिला वर्गात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले असून, अशा उपक्रमांमुळे महिलांची एकजूट अधिक मजबूत होण्यास मदत होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## आर्य चाणक्य मध्ये कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

तभा वृत्तसेवा

**पैठण, दि. ०९ मार्च :** जागतिक महिला दिनानिमित्त आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर पैठण येथील विविध क्षेत्रात अग्रेसर असलेल्या महिलांचा गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतमाता, राष्ट्र माता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा भाजपाच्या राष्ट्रीय सरचिटणीस रेखाताई कुलकर्णी, प्रमुख पाहुण्या नगराध्यक्षा विद्याताई कावसानकर, पंचायत समिती सदस्य सखुताई झारगड, प्रियंका निकाळजे, वर्षा काकडे, राणी माचेवाल, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्या शुभहस्ते करण्यात आली. याप्रसंगी विविध क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या सन्माननीय महिलांचा सत्कार पुस्तक, शाल व पुष्पगुच्छ देऊन व त्यांच्या कार्याचा परिचय मुलांना देत करण्यात आला. वैयक्तिक पद्य गीतांजली शेवतेकर यांनी सादर केले. प्रास्ताविकात मुख्याध्यापकांनी शाळेतील उपक्रमांची माहिती दिली व प्रमुख अतिथींचे शाळेशी असलेले ऋणानुबंध विशद केले.

महिला दिनाचे औचित्य सामोरे ठेवत सखुताई झारगड यांनी मुलींनी स्वावलंबी व्हावे, स्त्री शिक्षणाची नांदी तळागाळापर्यंत पोहचावी अशी इच्छा व्यक्त केली, तर प्रियंका निकाळजे यांनी प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर आहे ही भुषणास्पद बाब आहे हे सांगितले, पैठण शहराच्या प्रथम नागरिक सौ. विद्याताईंनी इतिहासातील सर्व महिला महानविभुतींना वंदन करून त्यांच्या कार्यामुळे आज आपण सक्षमपणे उभ्या आहोत असे सांगत त्यांचे ऋण व्यक्त करत महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोपात रेखाताईंनी महिलांसाठी असणाऱ्या शासकीय योजनांची माहिती दिली. समाजातील स्त्री शिक्षिकेची भूमिका व नेतृत्व कसे वंदनीय आहे हे विशद करत महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीम. ग्रीष्मा चौके यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्रीम. शिखा शाह यांनी केले.

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

**बिडकीन, दि. ०९ मार्च :** यश बहुद्देशीय शिक्षण संस्था संचालित दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल बिडकीन निलजगाव यांची ७ मार्च रोजी लगाने पार्क बिडकीन येथे मोठ्या उत्साहात पार पडल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन पैठणचे आ. विलास भूमरे, ॲड. विक्रम उंदरे यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमास उपस्थित काकासाहेब टेके, जि. प. सदस्य मनोज पेरे, मेहबूब शहा सहायक पोलीस निरीक्षक, निलेश शेळके, रमेश शिंदे, उपसरपंच किरण गुजर, सरपंच अशोक धर्मे, रिविक बारवाल, राहुल काळे. गणराया च्या गाणार्याने कार्युक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कलागुणांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या बहारदार नृत्यांची सर्वांचीच मने जिंकली. बिडकीन सरपंच अशोक धर्मे व ॲड. विक्रम उंदरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले. शेवटी राष्ट्रगीता ने कार्यक्रमाचा शेवट करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे अध्यक्ष ओमप्रकाश जैस्वाल, सचिव राजेंद्र जैस्वाल, रोशन जैस्वाल, यश जैस्वाल, सुरज सरसे मयुर स्वामी (मुख्याध्यापक निलजगाव), दर्शना कोकणे (मुख्याध्यापक बिडकीन) सुनिता चव्हाण, दिक्षा साबळे, नयना कहार, शितल कुमावत, सुषमा वंजारे, नितिन मोरे, प्रतिक्षा बत्ताले, कल्पना साळवे, सचिन साळवे, सीमा वंजारे आदींनी परिश्रम घेतले

## एमजीएममध्ये विशेष आरोग्य जनजागृतीपर व्याख्यान संपन्न

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०९ मार्च :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ बेसिक अँड अप्लाईड सायन्सेसच्या कम्युनिटी सायन्स विभागाच्या वतीने 'एम्पावर्ड हेल्थ: द रिदम ऑफ हार्मोनायझिंग पीसीओडी / पीसीओएस थ्रू लाइफस्टाइल' या विषयावर विशेष आरोग्य जनजागृतीपर व्याख्यानाचे विद्यापीठाच्या आर्यभट्ट सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या विशेष व्याख्यानात डॉ.मयूरा काळे आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या आहारतज्ञ मंजू मंथळकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला.



डॉ.मयूरा काळे यांनी आपल्या व्याख्यानात पीसीओएसच्या समस्येबाबत सविस्तर माहिती दिली. इन्सुलिन रेसिस्टन्समुळे पीसीओएस होण्याची शक्यता, दैनंदिन दिनक्रमाचे महत्त्व, हार्मोन्समधील बिघाडाचा आरोग्यावर होणारा परिणाम, पीसीओएसची लक्षणे तसेच या संदर्भातील गैरसमज याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच योग्य आहारपद्धती आणि पोषणाच्या मदतीने पीसीओएस नियंत्रणात कसे आणता येते याबाबतही त्यांनी माहिती दिली.

आहारतज्ञ मंजू मंथळकर यांनी पीसीओएसमध्ये पोषण व्यवस्थापन, स्थूलतेचे नियंत्रण, सर्केडियन रिदमचे महत्त्व, निरोगी आयुष्यासाठी दिवसाची योग्य सुरुवात कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले. तसेच पीसीओएसमध्ये औषधी वनस्पती आणि मसाल्यांचे महत्त्व व पोषणसंबंधित काळजी याबाबतही त्यांनी माहिती दिली.

या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख, कम्युनिटी सायन्स विभागाच्या विभागप्रमुख डॉ. आशा डागर, प्राध्यापक अंतरा कुलकर्णी, कनिका अरोरा तसेच प्राध्यापक, विद्यार्थी आणि संबंधित मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन साबिला रशाद यांनी केले.

## प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत पहिल्या टप्प्यात ११७ लाभार्थ्यांना मंजुरी पत्रांचे वितरण



तभा वृत्तसेवा

**गंगापूर, दि. ०९ मार्च :** प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत गंगापूर नगरपरिषद हद्दीतील पहिल्या टप्प्यात एकूण ११७ पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी पत्रांचे वितरण आज करण्यात आले. हा कार्यक्रम गंगापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष मा. संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

याप्रसंगी प्रधानमंत्री आवास योजना कक्षाचे शहरस्तरीय तांत्रिक कक्षाचे स्थापत्य अभियंता तज्ञ श्री. शेख इजार यांनी उपस्थित लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. तसेच बांधकाम परवानगीसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

नगरपरिषदेचे अध्यक्ष मा. संजय जाधव यांनी लाभार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करत घरकुल बांधकाम लवकरात लवकर सुरू करण्याचे आवाहन केले. तसेच घरकुल योजनेबाबत कोणतीही अडचण किंवा तक्रार असल्यास नागरिकांनी थेट माझ्याशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच ज्या लाभार्थ्यांनी अद्याप घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नाही, अशा पात्र लाभार्थ्यांनी त्वरित आपली आवश्यक कागदपत्रे संबंधित विभागाकडे सादर करावीत व या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही नगराध्यक्ष मा. संजय जाधव यांनी केले. तसेच या पहिल्या डीपीआरनंतर पुढील टप्प्यात सुमारे ४०० अर्जदारांचा दुसरा डीपीआर प्रस्तावित असल्याची माहिती नागरिकांना देण्यात आली.

# प्रवक्ता: श्री. रवींद्र शर्मा, ब्रँड, कॉर्पोरेट कम्युनिकेशन आणि सीएसआर प्रमुख

## एसबीआय लाइफ इन्शुरन्सची नवीन ब्रँड मोहीम/टीव्हीसीमागील मुख्य विचार काय आहे?

वेगाने बदलणाऱ्या भारतात प्रत्येक वयोगटातील आणि विविध भागांतील लोकांच्या आकांक्षा झपाट्याने वाढत आहेत. मात्र त्याचवेळी कुटुंबाप्रती असलेली आर्थिक जबाबदारी ही जीवनातील निर्णयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असते. एसबीआय लाइफच्या नव्या ब्रँड मोहिमेचा गाभा याच विचारावर आधारित आहे, तो म्हणजे आपल्या प्रियजनांना दिलेली आश्र्वासने सुरक्षित असतात, तेव्हाच व्यक्ती आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी खऱ्या अर्थाने आत्मविश्र्वासाने पाऊल उचलू शकते.

नवीन टीव्हीसीमध्ये हा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. आर्थिक संरक्षण असल्यास व्यक्तीला तडजोड न करता मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि ती पूर्ण करण्याचे धाडस मिळते, हे या मोहिमेतून दाखवण्यात आले आहे. नवीन करिअरची निवड असो, मुलांच्या स्वप्नांना पाठबळ देणे असो किंवा स्वतःचा नवा उपक्रम सुरू करणे असो ही मोहीम संदेश देते की सुरक्षेची खात्री असते, तेव्हा व्यक्ती त्यांच्या इराद्यांवर अधिक ठामपणे आणि धैर्याने कृती करू शकतात.

हा विचार एसबीआय लाइफच्या 'अपने लिये, अपनों के लिये' या मूळ तत्त्वाशी सुसंगत आहे. जीवन विमा हे केवळ आर्थिक उत्पादन नसून जीवनातील महत्त्वाच्या निर्णयांना बळ देणारे साधन आहे, असा कंपनीचा विश्र्वास आहे. आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करून व्यक्तीला स्वप्ने आणि जबाबदाऱ्या यांचा समतोल साधता येतो आणि मनःशांतीसह पुढे जाता येते.

भावनिक आणि वास्तववादी कहाण्यांद्वारे ही मोहीम एसबीआय लाइफला आयुष्याच्या प्रवासातील विश्र्वासू सहकारी म्हणून सादर करते, जो व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षा आणि जबाबदाऱ्या दोन्हींचे संरक्षण करतो, तसेच भारतातील प्रत्येक व्यक्ती व कुटुंबाला जीवनातील सर्व स्वप्ने पूर्ण होऊ शकतात याची खात्री देतो.

**ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा यांची एसबीआय लाइफचे पहिले ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड का करण्यात आली? जॉली आणि पॉली कोणाचे प्रतिनिधीत्व करतात?**

आजचा ग्राहक महत्त्वाकांक्षी आहे, आत्मविश्र्वासू आहे आणि आयुष्यात अर्थपूर्ण ध्येये गाठण्याची जिद्द असणारा आहे. पण त्याचवेळी तो कुटुंबाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांबाबतही तितकाच जागरूक असतो. निर्णय केवळ भावनेच्या भरात घेतले जात नाही, तर स्वप्नं आणि जबाबदारी यांचा समतोल साधत घेतले जातात. या बदलत्या विचारसरणीनुसार ब्रँड ॲम्बेसेडरची निवड आधारलेली आहे.

ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा हे दोघेही आयुष्यातील या दोन परस्परपूरक दृष्टिकोनांचे सहज प्रतिनिधीत्व करतात. त्यांना 'जॉली' आणि 'पॉली' म्हणून सादर करण्यात आले आहे. ते केवळ पारंपारिक सेलिब्रिटी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून समोर येत नाहीत, तर जीवनातील महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या दोन भिन्न मानवी प्रवृत्तींचे प्रतीक आहेत.

'जॉली आणि पॉली' ही संकल्पना भारतातील कुटुंबांमध्ये घडणाऱ्या अंतर्गत संवादाचे प्रतीक आहे, जेथे प्रगती करण्याची ओढ आणि आपल्या प्रियजनांची काळजी घेण्याची जबाबदारी यांचा समतोल साधला जातो. त्यांची भूमिका विम्याचे नाट्यमय सादरीकरण करण्याची नाही, तर विम्याला दैनंदिन जीवनाचा स्वाभाविक भाग म्हणून मांडण्याची आहे. जीवन विम्यामुळे व्यक्तीला सुरक्षिततेची भावना मिळते आणि त्यामुळे सकारात्मकता व प्रगतीचा मार्ग सुकर होतो, हा संदेश यातून दिला जातो.

ऋषभ पंतने साकारलेला 'जॉली' हा स्वभावप्रवृत्ती, आशावाद आणि भरभरून जगण्याच्या धैर्याचे प्रतीक आहे. नियोजन करणे म्हणजे स्वातंत्र्य गमावणे नसून, आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे आणि त्याची पूर्तता करणे, हे तो पटवून देतो. याउलट, रवींद्र जडेजाने साकारलेली 'पॉली' ही व्यक्तिरेखा संयम, विश्र्वासार्हता आणि दीर्घकालीन विचारांचे प्रतिनिधीत्व करते. तो अत्यंत शांतपणे आणि स्पष्टतेने संदेश देतो की, पूर्वतयारी किंवा नियोजन ही केवळ एक जबाबदारी नसून, ती वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि कौटुंबिक सुरक्षा या दोघांनाही बळ देणारी कृती आहे.

**ही मोहीम तरुण प्रेक्षकांशी कशी जोडली जाते?**

आजची तरूण पिढी महत्त्वाकांक्षी, सुजाण आणि स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास उत्सुक आहे. पण, त्याच वेळी ते कुटुंब, आर्थिक स्थैर्य आणि दीर्घकालीन सुरक्षितता यांप्रती असलेल्या आपल्या जबाबदाऱ्यांबाबत देखील अधिकाधिक जागरूक होत आहेत. ही पिढी कौटुंबिक जबाबदाऱ्या टाळत नाही आहे; उलट, त्या जबाबदाऱ्या आणि स्वतःच्या छंदांचा किंवा आवडीचा पाठलाग यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करत आहे.

ही मोहीम भारतातील घराघरांत सर्रास आढळणाऱ्या प्रसंगांचे चित्रण करून आजच्या पिढीच्या विचारसरणीशी संलग्न होते. यामध्ये करिअरमधील बदल, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि जीवनातील अशा निवडी दाखवल्या आहेत ज्यामध्ये 'धाडस' आणि 'सावधगिरी' या दोन्हीचा मेळ आहे. ही मोहीम कोणत्याही क्लिष्ट आर्थिक संज्ञा किंवा तांत्रिक शब्दांचा वापर न करता, आर्थिक संरक्षण कशा प्रकारे शांतपणे आत्मविश्र्वास वाढवते हे दर्शवते. एकदा का कुटुंबाप्रती असलेल्या जबाबदाऱ्या सुरक्षित झाल्या की, तरुण पिढीला आपल्या आवडीच्या क्षेत्रांत (Passions) पूर्ण ताकदीने आणि प्रगतीशील पावले उचलणे कसे शक्य होते, हे या कथानकातून प्रभावीपणे मांडले आहे.

तरुण ग्राहक, विशेषतः पहिल्यांदाच विमा पॉलिसी घेणाऱ्यांसाठी, हा संदेश अगदी स्पष्ट आहे: लवकर नियोजन करणे म्हणजे निवडींवर मर्यादा आणणे नसून स्वतःला सक्षम बनवणे आहे. आपल्या प्रियजनांच्या गरजा सुरक्षित करून, तरुणांना त्यांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी एक प्रकारची स्पष्टता, आत्मविश्र्वास आणि मनःशांती मिळते, जी त्यांना मुक्तपणे प्रगती करण्यास वाव देते.

**आगामी काळात एसबीआय लाइफचा ब्रँडचा भर कशावर असेल?**

पुढील काळात एसबीआय लाइफचा ब्रँड भर लोकांच्या स्वप्नांना बळ देणाऱ्या सक्षम भागीदाराची भूमिका अधिक मजबूत करण्यावर राहील. आर्थिक सुरक्षितता व्यक्तीला आत्मविश्र्वासाने आयुष्य जगण्याची ताकद देते, हा विचार अधिक ठळकपणे मांडला जाईल. महत्त्वाकांक्षा आणि जबाबदारी यांचा समतोल साधणे हीच खरी प्रगती आहे, या भूमिकेला ब्रँड पुढेही अधोरेखित करेल. जीवन विमा हा केवळ गरजेपोटी घेतला जाणारा उत्पादन नसून, स्वातंत्र्य आणि नव्या शक्यता उघडणारा सजग निर्णय आहे, अशी भूमिका कंपनी मांडणार आहे.

'अपने लिये, अपनों के लिये' या तत्त्वाचा विस्तार करत एसबीआय लाइफ सांस्कृतिकदृष्ट्या सुसंगत कथानक तयार करण्यावर, ग्राहकांसोबत भावनिक नाते अधिक दृढ करण्यावर आणि आर्थिक संरक्षण अधिक सोपे व सुलभ बनवण्यावर भर देईल. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर, तसेच विविध भागांमध्ये आर्थिक संरक्षण अधिक सोपे आणि सहज उपलब्ध करून देणे, यावर विशेष लक्ष राहील.

त्याचबरोबर नवकल्पना, डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर आणि ग्राहककेंद्रित उपाययोजना यांवर भर देत नव्या, महत्त्वाकांक्षी भारताच्या गरजांशी सुसंगत सेवा विकसित केल्या जातील. संरक्षणाची गती आणि लोकांच्या स्वप्नांची गती यांत ताळमेळ राखणे, हेच उद्दिष्ट असेल.

थोडक्यात सांगायचे तर, देशातील प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक कुटुंबाच्या प्रगतीला चालना देणारे प्रेरणास्थान बनणे, हीच एसबीआय लाइफची भावी दिशा आहे.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# स्वयंपाकाच्या गॅस बुकिंग साठीचा एसएमएस मिळेना

## ग्राहकांमध्ये संभ्रम; पर्यायी व्यवस्था करुन गॅसचे वाटप

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** स्वयंपाकाच्या गॅस बुकिंग साठीचा एसएमएस मिळेना ग्राहकांमध्ये संभ्रम; पर्यायी व्यवस्था करुन गॅसचे वाटप सोनपेठ - अत्यावश्यक सेवेत मोडणाऱ्या स्वयंपाकाच्या घरगुती गॅस टाकी बुकिंग साठी सध्या तांत्रिक अडथळा निर्माण झाला असून बुकिंग करण्यासाठी आपल्या भ्रमणध्वनी वरून फोन लावल्यानंतर मोबाईलवर बुकिंग क्रमांकाचा एसएमएस प्राप्त होत नसल्यामुळे ग्राहकांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. त्यामुळे आपल्याला स्वयंपाकाचा गॅस मिळणार की नाही? असा संभ्रम निर्माण झाला असताना सोनपेठ इंडियन गॅस कंपनीच्या वितरकाकडून पर्यायी मार्ग काढून पुरवठा सुरू असल्याचे सांगितले आहे.

प्रत्येक कुटुंबाच्या दैनंदिनी अन्नासाठी स्वयंपाकाचा गॅस आता अत्यावश्यक झाला आहे. केंद्र सरकारच्या उज्वल गॅस योजनेसह वैयक्तिक गॅसचे कनेक्शन आता घराघरात पोहोचले आहेत. त्यामुळे




स्वयंपाकाचा गॅस आता सर्वत्र अत्यावश्यक झाला आहे. आपल्या गॅसची टाकी संपली की, ती नवीन घेण्याअगोदर आपल्या भ्रमणध्वनी वरून फोन करून नवीन भरलेल्या गॅस टाकीची बुकिंग करायला लागते. त्यानंतर योग्य प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ग्राहकाच्या मोबाईलवर १८ अंकी बुकिंग क्रमांकाचा एसएमएस प्राप्त होतो.

परंतु गेली चार दिवसापासून सोनपेठ तालुक्यातील ग्राहकांनी गॅस टाकीच्या बुकिंग साठी फोन केल्यानंतर त्यांच्या मोबाईलवर बुकिंग क्रमांक प्राप्त होत नसल्याने नागरिक पुन्हा पुन्हा फोन करत आहेत.

> गॅसच्या बुकिंगसाठी सध्या वरिष्ठ पातळीवरून तांत्रिक अडचण निर्माण झाली असल्याने बुकिंग क्रमांकाचा एसएमएस प्राप्त होत नाहीत. सदरची अडचण लक्षात घेऊन कंपनी च्या सुचनेनुसार ग्राहकांचा मोबाईल नंबर,ग्राहक क्रमांक घेऊन गॅसची टाकी देण्यासाठी पर्यायी व्यवस्था सुरू केली आहे.त्यामुळे ग्राहकांनी गोंधळून जाऊ नये.तात्काळ प्रत्येकाला टाकी दिली उपलब्ध करून दिली जात आहे.
> -संजय राख (व्यवस्थापक,ईण्डेन गॅस सोनपेठ)

अनेक वेळा नागरीक दिवसातून दहा ते बारा वेळेस व रात्रीही बुकिंग करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु एसएमएस प्राप्त होत नसल्याने नागरिकात संभ्रम निर्माण झाला आहे. याप्रकरणी संबंधित विभागाने तात्काळ लक्ष देऊन निर्माण झालेली तांत्रिक अडचण दूर करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

# जिंतूर तालुक्यातील ग्रामसेवक दैनंदिनी सादरच करीत नाहीत पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचे कार्यवाही चे आदेश

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर पंचायत समिती अंतर्गत कार्यरत ग्रामसेवक /ग्राम विकास अधिकारी आपल्या कार्याची नोंद वही दैनंदिनी सादर न करताच त्यांचा अलबेल कारभार चालत असल्याची माहिती उघडकीस आली आहे
जिंतूर तालुक्यातील एकूण ६५ ग्रामसेवक पैकी ६३ ग्रामसेवक आपल्या दैनिक कार्याची नोंद न ठेवता अथवा दैनंदिनी सादर न करताच आपला कार्यभार करतात असे माहिती अधिकार कायद्या मुळे उघडकीस आले आहे या बाबत भाजप चे व्यापारी जिल्हा आघाडी चे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार यांनी जिंतूर चे गटविकास अधिकारी यांना ग्रामसेवक दैनंदिनी ची मागणी दि २९/७/२०२५ रोजी मागील दि १/४/२०२२ ते दि १/७/२०२५ कालावधीची मागणी केली होती परंतु दोन महिने उलटूनही पंचायत समिती कडून माहिती मिळाली नाही प्रथम अपिलार्थी म्हणून अर्ज केल्या नंतर गटविकास अधिकारी यांनी दि २४/१०/२०२५ रोजी १५ दिवसात माहिती देण्याचे आदेश देताच माहिती अधिकारी यांनी दि ७/११/२०२५ रोजी अशी माहिती दिली की एकूण ६५ ग्रामसेवक कार्यरत असून त्या पैकी तीन ग्रामसेवक जी ए पांढरे,यांची दि ६/८/२०२४श्रीमती के ए घुगे,यांची ३/२/२०२४ व जी एस साळवे यांची दि दि ४/५/२०२४ पर्यंत ची डायरी या तीन ग्रामसेवक यांनी वरील प्रमाणे दैनंदिनी सादर केली आहे त्याची माहिती सह डायरी दिली उर्वरित ६२ग्रामसेवक दैनंदिनी (डायरी )सादरच करीत नाही म्हणून कोकडवार यांनी दि ७/१/२०२६ पासून कार्यवाही ची मागणी केली परंतु पंचायत समिती स्तरावर दखलच घेतली गेली नाही म्हणून त्यांनी थेट परभणी जिल्हा पालकमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांना दि १/३/२०२६ रोजी लेखी पत्र देऊन कार्यवाही ची मागणी केली असता पालकमंत्री यांनी जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी परभणी यांना सदर प्रकरणाची तपासणी करून कडक कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत.

एकंदर जिंतूर पंचायत समिती कार्यालयात कधीही कोणताही अधिकारी कर्मचारी कधीच टेबलवर जागेवर नसतात मुख्यालय ठिकाणी राहत नाहीत परिणामी शेतकरी नागरिक त्रस्त होताना नेहमी दिसून येतात.

## जिंतूरात कुणबी प्रमाणपत्र वाटप

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यात हैद्राबाद गॅझेटनुसार मराठा समाजाला मराठा-कुणबी,कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया महसूल प्रशासनाकडून वेगाने राबविण्यात येत असून सोस, आडगाव दराडे,मानधानी आदी गावांतील अनेक विद्यार्थी व नागरिकांना याचा मोठा लाभ होत आहे. उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या पुढाकाराने ही प्रक्रिया अधिक गतिमान व पारदर्शक करण्यात आली असून दलालमुक्त पद्धतीने प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येत आहेत.

## वृत्तपत्र विक्रेता सुनील करपे यांच्या हाताला कडकडून मोकाट पिसाळलेल्या कुत्र्याचा चावा



**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहरातील वृत्तपत्र विक्रेता सुनील करपे आज रोजी सकाळी नारायण चाळ परिसरात वृत्तपत्र अंक वाटप करण्यासाठी जात असताना अचानकच त्या परिसरातील मोकाट कुत्रा त्याच्या हाताला कडा कडून चावा घेत अत्यंत गंभीर जखम केल्यामुळे त्याला सिविल हॉस्पिटल येथे ऍडमिट करण्यात आले आहे.

नारायण चाळ नीरज हॉटेल या परिसरातील मोकाट कुत्र्याचा प्रश्न मागच्या एक महिन्यापासून मोकाट कुत्र्यांनी जवळजवळ १५ ते २० जणांना चावा घेतल्यामुळे आज रोजी सिविल हॉस्पिटल येथे रेबीज इंजेक्शन साठी या परिसरातील नागरिक सिविल ला जाताना दिसत आहेत तसेच या परिसरातील हॉटेल व्यवसायिक जाधव यांच्या दहा वर्षाच्या मुलीला सुद्धा या कुत्र्यांनी चावा घेतल्यामुळे गंभीर अवस्थेत ऍडमिट असून इंजेक्शनचा कोर्स त्या लहान दहा वर्षाच्या मुलीला सुद्धा करावा लागत आहे नाहीतर पूर्ण परभणी शहरात मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त लावण्या महानगरपालिका कूचकामी ठरत आहे मोकाट कुत्र्यांचा रोगराई मुळे इतर गंभीर आजार होण्याचे प्रमाण अधिक असून याकडे या परिसरातील व इतर परिसरातील मोकाट कुत्र्यांचा नायनाट करावा अशी नागरिकांकडून परिसरातील नागरिकातून चर्चा होत आह

# २४ मे रोजी पूर्णेत सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन : सामूहिक विवाहासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**पूर्णा /प्रतिनिधी-** नांदेड येथील श्री गुरु सेवाभावी संस्थेच्या वतीने २४ मे रोजी पूर्णा येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

आर्थिक अडचणींमुळे कोणाचेही लग्न थांबू नये तसेच समाजातील गरीब, शेतकरी, कष्टकरी व वंचित घटकातील तरुण-तरुणींना सन्मानाने विवाहबद्ध होता यावे, या उद्देशाने नांदेड येथील श्री गुरु सेवाभावी संस्था यांच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून, या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक जोडप्याला शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत २५ हजार रुपयांचे अनुदान मिळणार आहे. हा सामूहिक विवाह सोहळा रविवार २४ मे २०२६ रोजी दुपारी १२.३५ वाजता जिल्हा परिषद शाळा येथे संपन्न होणार आहे. विशेष म्हणजे या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक जोडप्याचा विवाह त्यांच्या धर्म व परंपरेनुसार लावून देण्यात येणार आहे.

सामूहिक विवाहासाठी नोंदणी करताना वधूचे वय किमान १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे पूर्ण असणे आवश्यक असून त्यासाठी जन्म दाखला किंवा आधार कार्ड सादर करणे बंधनकारक आहे. तसेच रहिवासी प्रमाणपत्र, टी.सी. किंवा ग्रामपंचायतीचा वयाचा दाखला, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो व वधूच्या आई किंवा वडिलांच्या बँक पासबुकची झेरॉक्स प्रत सादर करावी लागणार आहे.

या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी मास्टर सुनील भालेराव, रंगनाथ मासे, सतिश तुरे, साईल शाह मौलाना, ज्योतीबा जावळे, प्रकाश जल्हारे (परभणी), पांडुरंग निर्मले, बालाजी नरहरि शिंदे (बडबडी), साहेबराव एंगडे, यशवंत लामसुंगे, सुभाष कापुरे, धम्मदिप कांबळे, विजय गायकवाड, आनंद दिपक (डॉन), अशोक वाघमारे (कानखेड), बंडु गाडे (माखनी), सुभाष वाघमारे, गोविंद गजभारे, अंबादास डोंगरे, देवीदास कापुरे, किशोर दुयीले, सुभाष गोडदे, रत्नदिप वेडे, एस. टी. गायकवाड (बलसा), अशोक भालेराव (जिंतूर), प्रकाश कांबळे (असोला), सतिश गवळे (नांदेड), नारु आहेरे, सुभाष गायकवाड (परभणी), सुदर्शन कसबे, श्री साई लॅब (पूर्णा), किरण तुपे, बालाजी कांबळे (बडबडी), सौ. रचना भालेराव, श्रीमती पंचफुलाताई साळवे, सौ. भाग्यश्री सुर्यतळ, गोरीबी शेख (माटेगाव), सौ. रेखा खरे व सौ. ज्योती वाघमारे आदींचा समावेश आहे.

या सामूहिक विवाह सोहळ्याचे संयोजक चक्रवती वाघमारे असून इच्छुकांनी अधिक माहितीसाठी ८८६२०५८१११, ९११२२५२८५२, ९११२७४९३९७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. नांदेडकर यांची राज्य शासन समितीवर नियुक्ती

**परभणी,/प्रतिनिधी :-** येथील पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयातील पशु अनुवंश व पैदास शास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. पंडीत विरभद्र नांदेडकर यांची राज्याच्या अत्यंत महत्त्वाच्या पशुधन धोरण निश्चिती समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे. शुक्रवार ६ मार्च रोजी राज्य शासनाने ही नियुक्ती जाहीर केली.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसायांचे विभाग अंतर्गत पशुधोरण हे सर्वंकष असण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याच अनुषंगाने राज्यातील विविध पशुधन क्षेत्रातील अभ्यासू व अनुभवी तज्ञांची समिती गठीत करून या अनुषंगाने नवीन पशुधन धोरणाचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी राज्य शासनाने या समितीवर सोपवली आहे. महाराष्ट्र राज्याच्या अत्यंत महत्त्वाच्या पशुधन धोरण निश्चिती समितीवर डॉ. नांदेडकर यांची सदस्य म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्राणेश येवतीकर व ईतर सहकारी यांनी अभिनंदन केले व पुढील पशुधन धोरण निश्चितस शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, डॉ. नांदेडकर हे पशुवैद्यकीय महाविद्यालयात रुजू होण्यापूर्वी केंद्र शासनाच्या भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या अंतर्गत असलेल्या मुंबई येथील राष्ट्रीय प्रजनन स्वास्थ संशोधन संस्थेमध्ये शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते. त्यानंतर गेल्या १७ वर्षापासून पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय परभणी येथे पशु अनुवंश व पैदास विभागात कार्यरत आहेत. डॉ. नांदेडकर यांनी आजपर्यंत राष्ट्रीय स्तरावर विविध लेख प्रकाशित केले असून राष्ट्रीय परिसंस्था सक्रिय सहभाग नोंदवला आहे. डॉ नांदेडकर यांनी २०२३ मध्ये 'देशातील पाळीव प्राण्यांची विविधता संवर्धन सोसायटी' ची २० वी राष्ट्रीय परिसंवाद परिषद परभणी येथे आयोजित केली व त्यामध्ये पशुअनुवंशा चे शास्त्रज्ञ, प्राध्यापक त तसेच पशु संवर्धन क्षेत्रातील निगडीत ४२३ मान्यवरांनी सक्रीय सहभाग घेतला होता. डॉ. नांदेडकर, हे भारतीय कृषी अनुसंधान परिषदच्या अंतर्गत असलेल्या नॅशनल ब्युरो ऑफ निमल जेनेटिक रिसोर्सेस, करनालच्या सहकार्याने स्थापित 'देशातील पाळीव प्राण्यांची विविधता संवर्धन सोसायटी' चे २०२२ पासून निर्वाचित कार्यकारी सदस्य आहेत. त्यांनी जैव तंत्रज्ञान विभाग, भारत सरकारच्या दोन योजनामधून परभणी येथील महाविद्यालयास २०१५ ते २०२१ आहेत.

## उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे शाळांच्या वेळेत बदल होणार जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांद्वारे आदेश जारी

**परभणी,/प्रतिनिधी :** सध्या मार्च महिना सुरु आहे. उन्हाची तीव्रता आतापासूनच तीव्रतेने जाणवत आहे. अख्खा उन्हाळा ओळखून आरोग्य विषयक समस्या उद्भवू नयेत व विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे हीत लक्षात घेऊन जिल्हा परिषद अंतर्गत सर्व व्यवस्थापन, सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या वेळापत्रकात १० मार्च पासून बदल होणार आहेत.

एका सत्रात भरणाऱ्या शाळांची वेळ सकाळी ८.३० ते १, शाळांची मधली सुट्टी ११ ते ११.३० अशी तीस मिनीटं, दुबार पध्दतीने भरणाऱ्या शाळांची वेळ निश्चित करुन कार्यालयीन तास पूर्ण करण्याच्या अनुषंगाने मुख्याध्यापकांनी नियोजन करुन संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांना सादर करावे, असे निर्देश शिक्षणाधिकारी प्राथमिक व शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी दिले आहेत. आरटीई अधिनियम २००९ नुसार नियोजित अध्यापनाच्या तासात कोणतेही बदल असणार नाहीत, अशीही स्पष्टता करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांसाठी न्यायालय व रस्त्यावरील संघर्ष सुरूच ठेवणार - ॲड. अजित काळे

**सोनपेठ ,/प्रतिनिधी:** शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपण न्यायालयीन लढ्यासोबतच रस्त्यावरील संघर्षही सुरुच ठेवणार असल्याची ग्वाही जेष्ठ विधिज्ञ शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी दिली.

२०२० मधील पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा व्हावी यासाठी परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने उच्च न्यायालयात निःशुल्क दावा लढवुन त्यांना शेकडो कोटी रुपये व्याजासह मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणारे छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयातील जेष्ठ विधिज्ञ शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांचा परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने नागरी सत्कार सोहळा व शेतकरी हक्क परिषदेचे आयोजन शेळगाव महाविष्णू येथे करण्यात आले होते. यावेळी सत्काराला उत्तर देतांना ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालीदास आपेट होते, तर सुधीर बिंदु, अमृत शिंदे, बंडू सोळंके, दगडूबा वजीर, इरशाद चाँद पाशा, किरण चक्रपाणी, शिवाजी बोबडे, अनंत काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्ह्यातील अनेक शेतकरी, कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सातत्याने लढा देत पिक विमा मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या ॲड. अजित काळे यांच्या कार्याचा जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या वतीने गौरव करण्यात आला.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. अजित काळे म्हणाले की, न्यायव्यवस्था कागदोपत्री प्रक्रियेवर चालत असली तरी सामान्य माणसाला न्याय मिळवण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पिक विमा हा शेतकऱ्यांवर कोणताही उपकार नसून तो केंद्र व राज्य शासनाचे कर्तव्य आहे. महाराष्ट्रातील पिक विमा योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असून मंत्री, अधिकारी व कर्मचारी यांची घरे भरली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.
शासनाच्या योजना समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचतात की नाही, यावर लक्ष ठेवणारी स्वतंत्र यंत्रणा निर्माण झाली नाही, हे दुर्दैव असल्याचेही त्यांनी नमूद केले. शेतकरी संघटित नसल्यामुळे अनेक प्रश्न दुर्लक्षित राहतात. धाडसाने प्रश्न विचारणे आणि हक्कासाठी आवाज उठवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपण न्यायालयीन लढ्यासोबतच रस्त्यावरील संघर्ष ही सुरुच ठेवणार असल्याची ग्वाही त्यांनी सत्काराला उत्तर देताना दिली.
शेतकऱ्यांनी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून आपल्या प्रश्नांसाठी एकत्र येणे आवश्यक असल्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात शेतकरी चळवळीतील हेमचंद्र शिंदे, विश्वंभर गोरवे व कालीदास आपेट यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अवधुत गिरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेळगाव येथील ग्रामस्थांनी परीश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त...

### मनसेच्या जिल्हा संघटकाचा नांदेडला आत्मदहनाचा प्रयत्न

**परभणी,/प्रतिनिधी:-** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या दालनातील नियमबाह्य वातानुकूलीत यंत्रणा काढण्या संदर्भात ठोस कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा संघटक श्रीनिवास उर्फ सोनू लाहोटी यांनी सोमवार ९ मार्च रोजी नांदेड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिक्षक अभियंत्यांच्या कार्यालयात अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्यावेळी नांदेड येथील भाग्य नगर पोलिसांनी लाहोटी यांना ताब्यात घेतले.

### ज्येष्ठ नागरीक दत्तराव तिडके यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी :** गंगाखेड येथील अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्व कार्यकर्ते सिध्देश्वर तिडके यांचे वडील दत्तराव तिडके यांचे सोमवार ९ मार्च रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६२ वर्षांचे होते.

दरम्यान, तिडके यांच्या पार्थीवावर आज सायंकाळी साडे सहा वाजता परळी रस्त्यावरील गोविंदवाडी शिवारातील शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### थकीत वेतनाच्या निषेधार्थ मनपा कर्मचारी ३१ मार्चपासून कामबंद आंदोलन करणार

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेंतर्गत सफाई कामगारांचे चार महिन्यांचे व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे ५ महिन्यांचे थकीत वेतन त्वरित वितरित करावेत, तसेच अन्य मागण्यांची गांभीर्याने दखल घ्यावी यासाठी महानगरपालिका सफाई कामगार व कर्मचारी संघटनेने ३१ मार्च पासून कामबंद आंदोलन करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

या संघटनेचे अध्यक्ष श्रीमती अनुसयाबाई जोगदंड, उपाध्यक्ष पिराजी हत्तीअंबीरे, सचिव के.के. भारसाखळे, सहसचिव किरण साळवे, कार्याध्यक्ष एम.आर. ढाले तसेच अन्य पदाधिकाऱ्यांनी महानगरपालिकेच्या आयुक्तांना आज सोमवार ९ मार्च रोजी एक तपशीलवार निवेदन सादर केले. त्याद्वारे, महापालिकेंतर्गत सफाई कामगार सणासुदीच्या काळातसुध्दा थकीत वेतनापासून वंचित असल्याबद्दल तीव्र खंत व्यक्त केली. काही दिवसांवरच गुढी पाडवा आला आहे, रमजान ईद समोर आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती पुढील महिन्यात आहे. परंतु, महानगरपालिका प्रशासनाने ऑक्टोंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२५चे सफाई कामगारांचे चार महिन्यांचे वेतन व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे पाच महिन्यांचे वेतन वितरित केले नाही. वार्षिक वेतनवाढ, संप काळातील सहा दिवस, वैद्यकीय रजा, अर्जित रजा, मंजूर झालेली बिले, इत्यादीच्या रक्कमाही थकीत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य कामगारांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहीला आहे. उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. गेल्या महिन्यात एका महिन्याचे वेतन दिल्या गेले, तेसुध्दा बँक हफ्ते कपात करीत, वेतन वेळेवर नसल्यामुळे या कर्मचाऱ्यांना बँकेचे हफ्तेसुध्दा नियमितपणे भरता येईनासे झाले आहेत, व्याजाचा भूर्दंड सहन करावा लागतो आहे, या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने एकूण ८ मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा, अन्यथा २७ मार्च पासून सर्व सफाई कामगार दुपारी २ वाजल्यानंतर मुख्य कार्यालयासमोर आंदोलन करतील, तसेच ३१ मार्च पासून सर्व सफाई कामगार कामबंद आंदोलन सुरु करतील, असा इशारा दिला आहे.

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार निदर्शने : परिपत्रकाची होळी

**परभणी,/प्रतिनिधी :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार निदर्शने : परिपत्रकाची होळी

परभणी,दि.०९(प्रतिनिधी) : शेतकऱ्यांचा सातबारा पूर्णतः कोरा करा यासह अन्य मागण्यांसह स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या संतप्त कार्यकर्त्यांनी सोमवार ९ मार्च रोजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करीत परिपत्रकाची होळी केली. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा पूर्णतः फसवणूकीचा प्रकार आहे, असे नमूद करीत या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी संपूर्ण सातबारा कोरा झालाच पाहिजे, फसव्या व तकलादू योजनेऐवजी थकबाकीदारांसह नियमितपणे हफ्ते भरणाऱ्या शेतकऱ्यांना पूर्णतः कर्जमाफी करीत मोठा दिलासा दिला पाहिजे, अशी अपेक्षा या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

### भारतीय कम्युनिष्ट पक्षातर्फे अमेरिकन हल्ल्याच्या विरोधात निदर्शने : इराणच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी

**परभणी,/प्रतिनिधी :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर सुरु केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ भारतीय कम्युनिष्ट पक्षाच्या संतप्त पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी सोमवारी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली.

केवळ तेलसाठ्यांवर स्वतःचे नियंत्रण प्रस्थापित व्हावे, या हेतूनेच अमेरिकेने काही राष्ट्राच्या सहकार्याने इराणवर वर्चस्व प्रस्थापित करण्याकरीता एकतर्फी हल्ले सुरु केले आहेत. यातून अमेरिकेने स्वतःची दादागिरी, हिटलरशाही सुरु केली आहे, असे नमूद करीत या आंदोलनकर्त्यांनी इराणच्या समर्थनार्थ भारत सरकारनेही भक्कमपणे उभे रहावे, अशी मागणी केली.

### डॉ. विठ्ठल जायभाये यांच्या 'तुकाराम नीती''ला राज्यस्तरीय पुरस्कार

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** एकता फाउंडेशन महाराष्ट्र २०२५-२६ वर्षातील साहित्य क्षेत्रातील पुरस्कार एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ कवी अनंत कराड यांनी घोषित केले असून नव्या पिढीतील संत साहित्याचे साक्षेपी अभ्यासक, व्याख्याते, कवी, कीर्तनकार प्रा. डॉ. विठ्ठल खंडुजी जायभाये यांच्या 'जगद्गुरु संत तुकोबांचे अभंग विवेचन तुकाराम नीती' ग्रंथाला जाहीर झाला असून २४ मार्च रोजी पाडळी (ता. शिरूर (कासार) जि.बीड) येथे ८ व्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनात डॉ. जायभाये यांचा सन्मान होणार आहे.

'तुकाराम नीती' हा ग्रंथ डॉ. जायभाये यांनी वर्तमानपत्रात सलग वर्षभर केलेले स्तंभलेखन असून छत्रपती संभाजीनगर येथील वैजनाथ वाघमारे यांच्या 'शब्दवेध बुक हाऊस'ने प्रकाशित केला आहे. प्रा. इंद्रजित भालेराव, तुकोबांचे वंशज डॉ. सदानंद मोरे, संत चोखामेळा अध्यासन केंद्राचे सचिन पाटील, पोलीस अधीक्षक दिगंबर कदम, कथाकार डॉ. भास्कर बडे, किशन उगले, प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत आदी मान्यवरांनी आपले अभिप्राय नोंदवले असून समकालीन परिस्थितीत तुकोबा सर्वांचे पथदर्शी आहेत याचे प्रतिपादन ग्रंथात झाले आहे. या पुरस्काराबद्दल ह.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष तथा नगराध्यक्ष परमेश्वर कदम, रामेश्वर कदम, प्राचार्य डॉ. वसंत सातपुते आदिंसह डॉ. जायभाये यांचे अभिनंदन होत आहे.

## अग्रलेख...

# युनोचा काही उपयोग आहे?

जग जेवढे आधुनिक आणि तंत्रज्ञानाने परिपूर्ण होत आहे, तेवढेच ते अत्यंत हिंसक आणि स्वार्थी होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. जगाने यापूर्वी दोन विनाशकारी महायुद्धांचा अनुभव घेतला आहे. दुसऱ्या महायुद्धात लक्षावधी नागरिक प्राणास मुकले. ज्यांचा युद्धाशी काहीही संबंध नव्हता, अशा नागरिकांची संख्या मृतांमध्ये सर्वांत जास्त होती. इतरांचे प्रदेश बळकावण्याच्या नादापायी पहिले आणि दुसरे महायुद्ध लढले गेले. या विनाशकारी युद्धांनंतर जगात शांतता राखण्यासाठी २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघाची (युनो) स्थापना झाली. विविध देशांमधील वाद संघर्षाऐवजी चर्चा करून सोडविण्यासाठी हा जागतिक मंच सक्रिय भूमिका पार पाडेल, अशी अपेक्षा होती. पण, दुर्दैवाने ही अपेक्षा फोल ठरली हे वारंवार उद्भवणाऱ्या जागतिक संघर्षांनी सिद्ध झाले आहे. युनोच्या मध्यस्थीने मोठा संघर्ष थांबल्याचे एकही उदाहरण उपलब्ध नाही. याचे कारण म्हणजे ज्या बड्या देशांकडे संघर्ष थांबविण्याची जबाबदारी आहे, ते अमेरिका, रशिया, चीन हे प्रमुख देशच युद्धखोर आहेत आणि शिवाय ते युनोच्या सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य आहेत. या देशांकडे विशाल भूभाग, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि प्रचंड श्रीमंती असतानाही दुसऱ्यांच्या जमिनीवर या त्रिकुटाचा डोळा असतो. अमेरिकेने अनेक गरीब देशांना देशोधडीला लावले. इराक, सीरिया, अफगाणिस्तान, लिबिया आदी देश अजूनही सावरलेले नाहीत. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांना त्यांच्या निवासस्थानात घुसून अमेरिकेने त्यांचे अपहरण केले. डोनाल्ड ट्रम्प यांची ही कृती एखाद्या हुकूमशहासारखी आहे. व्हेनेझुएलाकडे कच्च्या तेलाचे विशाल साठे आहेत. त्यावर काळी नजर असलेल्या ट्रम्प यांनी मादुरोंना पदच्युत करीत बळजबरीने त्यांचे अपहरण केले. ट्रम्प यांची ही कृती केवळ आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन तर आहेच, शिवाय ते अनैतिक कृत्य आहे. पण, निषेध करण्यापलीकडे युनो काहीही करू शकली नाही. अमेरिका, रशिया आणि चीन या बड्या देशांच्या युद्धखोर वृत्तीला लगाम लावण्याची हिंमत युनोत नाही. जगाला वेठीस धरण्याचे काम हे देश वारंवार करीत आले आहेत. त्यांना वाटेल तेव्हा युद्ध करायचे, दुसऱ्यांची भूमी दरोडेखोराप्रमाणे बळकाविण्याचे पाप हे देश करीत आले आहेत. आकाराच्या बाबतीत रशियाचा जगात प्रथम क्रमांक लागतो, पण केवळ जमिनीसाठी त्याने युक्रेनवर युद्ध लादले. यापूर्वी क्रिमिया तर गिळंकृत केलाच आहे. चीनचेही तसेच. अत्यंत घातकी आणि दगाबाज असलेल्या ड्रॅगनने एकही शेजारी देश सोडलेला नाही. मंगोलिया, भारत, तुर्कस्थान, भूतान, तैवान, तिबेट, फिलीपिन्स, व्हिएतनाम, इंडोनेशिया आदी देशांची भूमी त्याने हिसकावली आहे. दक्षिण चीन सागरात चीनची दादागिरी आहे. जवळपास ४१ लाख चौरस किलोमीटर एवढ्या विशाल भूभागावर चीनने बेकायदेशीर ताबा मिळविला. जमिनीचे हे प्रमाण चीनच्या कायदेशीर भूभागाच्या तुलनेत ४३ टक्के एवढे आहे. ज्या देशांवर जगात शांतता प्रस्थापित करण्याची आणि स्थिरता ठेवण्याची जबाबदारी आहे ते देशच युद्धखोर आहेत. त्यामुळे शांततावादी आणि कमकुवत असलेल्या देशांनी कुणाकडे दाद मागायची हा प्रश्न निर्माण झाला आहे. सुरक्षा परिषद आणि आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्था या जगातील सर्वांत शक्तिशाली संघटना आहेत. पण, कायम शांततेचा पुरस्कार करणारा आणि जागतिक शांततेची कामना करणारा बुद्धाचा भारत या दोन्ही संघटनांचा सदस्य नाही, हे दुर्दैव. युनोच्या सुरक्षा परिषदेतील पाच स्थायी सदस्यांना (अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स व ब्रिटन) मिळालेला नकाराधिकार (व्हेटो) हा जागतिक शांततेच्या समोर असलेला सर्वांत मोठा अडथळा आहे. स्वतःच्या फायद्यासाठी नकाराधिकाराचा गैरवापर या तथाकथित बड्या देशांनी केल्याची अनेक उदाहरणे आहेत. भारतात अनेक दहशतवादी हल्ले घडविणाऱ्या मौलाना मसूद अजहरला दहशतवादी घोषित करण्याच्या भारताच्या प्रस्तावाविरोधात चीनने नकाराधिकाराचा वापर केला. सुरक्षा परिषदेतील सदस्यसंख्या वाढविण्याची मागणी भारत, ब्राझील, दक्षिण आफ्रिका हे देश बराच काळ करीत आहेत; पण, त्याला चीन आणि अमेरिका आडकाठी आणत आहेत. सुरक्षा परिषद अशी असल्यामुळे जगात वारंवार संघर्ष निर्माण होत असताना ते रोखण्यात युनोला साफ अपयश आले आहे.

खरे तर सुरक्षा परिषदेतील बड्या देशांनी मन मोठे करीत आणि बलवान असूनही प्रसंगी लवचीकता दाखवून संघर्ष होणार नाहीत याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. क्षणात पृथ्वी नष्ट करण्याची क्षमता असलेली महाविनाशकारी शस्त्रे आज काही देशांकडे आहेत. सुदैवाने हिरोशिमा-नागासाकीनंतर कोणत्याही देशाने अण्वस्त्रांचा वापर केलेला नाही. पण, दुर्दैवाने याच अण्वस्त्रांचा धाक दाखवीत दबावनीतीचे राजकारण करण्यात हे बडे देश सर्वांत पुढे असतात. जून २०२५ मध्ये इराण-इस्रायल यांच्यात १२ दिवस भीषण संघर्ष झाला. हे युद्ध रोखण्यात युनोला यश आले नाही. संघर्षात शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला. हजारो घरे नष्ट झालीत. वित्त आणि प्राणहानी रोखण्यासाठी संघर्षविराम केला होता, पण तणाव मात्र कायम राहिला. जेमतेम आठ महिन्यांच्या शांततेनंतर हे दोन्ही देश पुन्हा मैदानात उतरले आहेत. रशिया-युक्रेन युद्ध संपलेले नसताना पश्चिम आशियात नवा संघर्ष पेटला आहे. इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते दिवंगत अयातुल्लाह अली हुसेनी खामेनी यांच्या अडेलतट्टू भूमिकेमुळे अमेरिकेचे युद्धखोर राष्ट्रप्रमुख डोनाल्ड ट्रम्प यांना मध्य पूर्वेत हल्ला करण्याची संधी मिळाली. युक्रेन-रशिया युद्धाचा परिणाम युरोपातील काही देश आणि बाल्कन प्रदेशांपुरताच मर्यादित राहिला. आता इराण-अमेरिका संघर्षामुळे जगासमोर ऊर्जा संकट उभे ठाकले आहे. भारतावर त्याचे परिणाम जाणवू लागले आहेत.

मध्यपूर्वेतील देशांमध्ये कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचे विशाल साठे आहेत. ऊर्जा गरज भागविण्यासाठी भारतासह अनेक देशांची मदार या आखाती देशांवरच आहे. भारतासारख्या १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशाला याचा मोठा आर्थिक फटका बसणार आहे. या युद्धाशी भारताचा काहीही संबंध नसला तरी त्याचे परिणाम जाणवू लागले आहेत. भारताची एलपीजी गॅसची जवळपास ८५ ते ९० टक्के गरज मध्यपूर्वेतील देशांकडून आयात करून भागवावी लागते. संयुक्त अरब अमिरातीकडून ४० टक्के, कतारकडून २० तर सौदी अरेबियाकडून आणि कुवैतकडून जवळपास १५ टक्के एलपीजीची आयात भारताला करावी लागते.

भारत दरवर्षी ३० दशलक्ष टन एलपीजीची आयात करतो. देशांतर्गत उत्पादनातून गरज भागत नसल्याने दरवर्षी ६० ते ६५ टक्के घरगुती वापराचा गॅस आयात करावा लागतो. दुर्दैवाने हे चारही देश युद्धात अडकल्याने स्वयंपाकाच्या गॅसची आयात बाधित झाली. परिणामी सरकारला सिलेंडरच्या किमतीत ६० रुपयांनी वाढ करावी लागली. भारतावर अवलंबून असलेले श्रीलंका, नेपाळ आणि भूतान या देशांनाही ऊर्जा संकटाला सामोरे जावे लागू शकते. इराणने या चारही देशांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन्सचा मारा करीत रिफायनरीज आणि वायू प्रकल्पांना लक्ष्य केले. तसेच होर्मुझ खाडीतील जहाज वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाल्याने संघर्ष आणखी आठ दिवस सुरू राहिल्यास आशियातील अनेक देशांपुढे ऊर्जासंकट उभे ठाकल्याशिवाय राहणार नाही. कारण, याच आखातातून आशियातील देशांना तब्बल ८९ टक्के तेल आणि वायूचा पुरवठा होतो. जगातील एकूण निर्यातीपैकी २५ टक्के कच्च्या तेलाची निर्यात आखातातून होते. कच्चे तेल आणि वायूच्या संदर्भात अमेरिका आणि इस्रायल संपन्न असल्याने या देशांना युद्धाचा फरक पडणार नाही. पण, आशियातील देश मात्र संकटात सापडले आहेत. युनोत काही धमक असेल आणि त्याच्या अस्तित्वाला काही अर्थ असेल तर त्याने हा संघर्ष संपुष्टात आणावा. अन्यथा, युनोचे असणे आणि नसणे यात फरक राहणार नाही.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# खामेनीचा अस्त, खामेनीचा उदय!

रमझानच्या महिन्यात इराणचे ८६ वर्षीय धार्मिक व सर्वोच्च नेते अयातोल्ला अली खामेनी अमेरिका- इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात ठार झाले आणि त्यांचा राजकीय पुनर्जन्मही झाला. अमेरिकेने ही कारवाई केली नसती तर आणखी काही वर्षांत खामेनींना नैसर्गिक मृत्यू आला असता आणि त्यांचे नाव इतिहासजमा झाले असते. मात्र, अमेरिकेने त्यांना ठार करून मध्यपूर्वेच्या इतिहासात खामेनींचे नाव जणू अमर करून टाकले आणि इराण आता खामेनीच्या मुलास नवा शासक घोषित करण्याच्या तयारीत आहे. असे झाल्यास खामेनींच्या अमरत्वावर एकप्रकारे शिक्कामोर्तब केले जाईल.

**हा तर भूकंप** : अमेरिका-इसायल यांनी इराणविरुद्ध सुरू केलेले युद्ध, त्यात खामेनी व इराणच्या काही नेत्यांचे ठार होणे यावर सर्वाधिक परखड भाष्य केले आहे ते एका अमेरिकन राष्ट्रपतीनेच. वयाच्या केवळ ४६ व्या वर्षी अमेरिकेचे राष्ट्रपतिपद भूषविणाऱ्या बिल क्लिंटन यांनी या साऱ्या घटनाक्रमावर केलेले भाष्य ट्रम्प यांना वेदनादायक ठरेल असे आहे. क्लिंटन यांनी समाज माध्यमांवर आपली भूमिका मांडली आहे. पहिल्या प्रतिक्रियेत त्यांनी म्हटले आहे, खामेनींचे ठार होणे हा एक भूकंप आहे आणि मोठ्या भूकंपानंतर काही काळ नंतरही धक्के बसत असतात. ते आता बसणार आहेत. राष्ट्रपतिपदाची ८ वर्षांची कारकीर्द पूर्ण करतानाही लोकप्रियतेच्या शिखरावर असण्याचे भाग्य ज्या काही अमेरिकन नेत्यांना लाभले त्यापैकी क्लिंटन एक. अगदी मोनिका लेविन्स्की प्रकरणात अडकल्यानंतरही त्यांच्या लोकप्रियतेत घट झाली नव्हती.

**ते काय होते?** : अमेरिकेने २०२५ च्या जून महिन्यात इराणच्या आण्विक संयंत्रांवर हल्ला करून ते नेस्तनाबूत केल्याचे आम्हाला सांगण्यात आले होते. आम्ही त्यावर विश्वास ठेवला. मग, आता हा हल्ला कशासाठी करण्यात आला? पुन्हा आण्विक संयंत्रांचे कारण सांगण्यात आले. आता जर इराणचे आण्विक संयंत्र उद्ध्वस्त करण्यात आले असेल तर मग २०२५ च्या हल्ल्यात काय उद्ध्वस्त करण्यात आले होते, काय साध्य करण्यात आले होते असा करडा प्रश्न क्लिंटन यांनी विचारला आहे. क्लिंटन पुढे म्हणतात, माझ्या ८ वर्षांच्या कार्यकाळात जवळपास दररोजच मला इराणबाबत निर्णय घ्यावे लागत होते. ते मी घेतले. झालेल्या चुका आम्ही दुरुस्त केल्या. प्रत्येक निर्णयाचे एक पावित्र्य असते. गंभीरता असते आणि युद्धासारख्या निर्णयाची गंभीरता तर अधिकच मोठी असते. पण, या युद्धाची माहिती राष्ट्रपतींच्या ओव्हल कार्यालयातून रीतसर न देता, गोल्फ मैदानावरून एक ६ मिनिटांची पोस्ट टाकून देण्यात आली. अमेरिकेच्या राष्ट्रपतिपदाचा असा 'सन्मान' राखण्यात आला.

**राजा-महाराजा नाही** : अमेरिकेचा राष्ट्रपती हा काही राजा- महाराजा नाही. आपल्या प्रत्येक निर्णयासाठी अमेरिकन जनतेला उत्तरदायी असणारे ते एक घटनात्मक पद आहे. युद्धासारखा मोठा निर्णय घेण्यापूर्वी काय काय करण्यात आले पाहिजे याची तरतूद अमेरिकन घटनेत करण्यात आली आहे. काय झाले त्या साऱ्या तरतुदींचे? सारे काही पायदळी तुडविण्यात आले. सर्व घटनात्मक संस्थांना अंधारात ठेवून, एका समाज माध्यमावर या निर्णयाची घोषणा करण्यात आली अशा जहाल शब्दांत क्लिंटन यांनी आपली भूमिका मांडली आहे.

**शिया-सुन्नी एकजूट** : मुस्लिम धर्मात शिया-सुन्नी हे दोन पंथ आहेत. दोघांचे कधी जमले नाही. पण, खामेनी ठार झाल्यानंतर सुन्नीबहुल देशांमध्येही जे वातावरण दिसून येत आहे, ते पाहता ट्रम्प यांनी शिया-सुन्नी यांच्यात एकजूट घडवून आणली असे मानले जाईल. ख्रिश्चन धर्मात पोप यांना जे स्थान असते, तेच स्थान खामेनी यांचे शिया पंथात होते.

**अनपेक्षित उत्तर** : अमेरिका-इस्रायल यांच्या संयुक्त हल्ल्यास इराणकडून दिले जात असलेले उत्तर अनपेक्षित असे आहे. अमेरिका आपल्या पल्ल्यात येणार नाही याची कल्पना असल्याने इराणने मध्यपूर्वेतील अमेरिकन लष्करी तळांना-वकिलातींना लक्ष्य बनवीत मोठ्या प्रमाणावर अमेरिकेचे नुकसान केले आहे. भारत-पाकिस्तान युद्धात किती विमाने पाडली गेलीत हे ट्रम्प अधूनमधून सांगत असतात. या युद्धात एका दिवसात अमेरिकेची किती लढाऊ विमाने जळून खाक झाली हे ट्रम्प यांनी आता सांगावे.

**चीनचा सहभाग** : भारत-पाकिस्तान युद्धात पाकिस्तानला सर्व प्रकारची मदत चीनने केली होती. आता रशिया व चीन हे दोन्ही देश इराणला लष्करी साहित्य पुरवीत आहेत. चीनने तर एक निवेदन प्रसिद्ध करीत, आपण इराणच्या पाठीशी ठामपणे उभे राहू हे सांगितले आहे. कारण, अमेरिकेला बलाढ्य होऊ देणे हे चीन व रशिया या दोन्ही देशांना परवडणारे नाही. इराणने मागील काही दिवसांत अमेरिकेच्या हवाई व नौदल तळाला ज्या अचूकपणे लक्ष्य केले आहे, ती इराणची ताकद नाही. हे सारे चीन करीत आहे. अमेरिकेच्या पाचव्या आरमाराचे मुख्यालय बहरिनमध्ये आहे. त्याला लक्ष्य करण्यात आले. कुवैतमध्ये असणाऱ्या हवाई तळाला मोठ्या प्रमाणावर नुकसान पोहोचविण्यात इराण यशस्वी झाला.चीनच्या साहाय्याशिवाय इराण हे करू शकत नाही. येणाऱ्या काळात इराण काही भयावह प्रक्षेपणास्त्रांचा मारा करू शकतो. कारण आता या युद्धाची सूत्रे इराणी नेतृत्वाच्या हाती राहिलेली नाहीत. या लढाईत हे नेतृत्व मारले गेले आहे. त्याची जागा आता चीन व रशियाने घेतली आहे. हेच देश आता इराणच्या लष्करी कारवाईचे सूत्रसंचालन करीत असल्याचे म्हटले जाते. इराणच्या भात्यात कोणकोणती शस्त्रास्त्रे आहेत याचाही अंदाज कुणाला बांधता आलेला नाही. मात्र, इराणवर अमेरिकेचा कब्जा होऊ न देणे ही बाब आता चीन व रशिया यांच्यासाठी प्रतिष्ठेची झाली आहे.

**इराण शाबूत** : इराणचे लष्करी नेतृत्व ठार झाल्याचा दावा अमेरिका करीत असली तरी इराणमधील लष्करी यंत्रणा कोलमडून पडल्याचे दिसत नाही. इराणचे लष्करी अधिकारी युद्ध सुरू ठेवण्यात, ते वाढविण्यात यशस्वी होत आहेत. दुसरीकडे या देशातील शाळा व रुग्णालयांवर अमेरिका व इस्त्रायलकडून जे हल्ले केले जात आहेत, त्याने इराणची जनता अमेरिकेच्या विरोधात गेलेली दिसत आहे. मधल्या काळात इराणची जनता खामेनींच्या राजवटीविरुद्ध बंड करण्याच्या स्थितीत दिसत होती. अमेरिकेच्या या हल्ल्यानंतर तेथील चित्र पार बदलल्याचे म्हटले जाते.

**हार्मूजची नाकेबंदी** : मध्यपूर्वेत भडकलेल्या या युद्धाचे राजकीय परिणाम तर आहेतच, शिवाय त्याचे आर्थिक परिणामही आहेत. इराणने हार्मूजची खाडी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. खाडीच्या दोन्ही बाजूला तेलवाहक जहाजांच्या रांगा लागल्या आहेत. भारत, जपानसह अशियातील देशांची ८६ टक्के तेलवाहतूक या खाडीतून केली जाते तर जगातील २५ टक्के तेलवाहतूक या खाडीतून होत असते. ही खाडी बंद करून इराण, कुवैत, बहरिन, कतार व संयुक्त अरब अमिरात या अमेरिकेच्या मित्र देशांची कोंडी करू शकतो.

**केवळ २४ तासांत** : अमेरिका व इस्रायल यांनी इराणचे आण्विक संयंत्र उद्ध्वस्त केल्याची घोषणा केली असली तरी इराण २४ तासांत अण्वस्त्र तयार करू शकतो असे सांगितले जाते.


इराणने अणुबॉम्बसाठी लागणारे युरेनियम ६० टक्के शुद्ध करण्याची क्षमता यापूर्वीच गाठली असल्याचे मानले जाते. प्रत्यक्षात अणुबॉम्बसाठी युरेनियमची शुद्धता ९० टक्के असावी लागते. याचा अर्थ इराण कमी धोक्याचे अण्वस्त्र तयार करण्याच्या स्थितीत आजही आहे आणि त्याला चीनचा सक्रिय पाठिंबा असल्याने काय काय होऊ शकते हे सांगण्याची गरज आहे?

## वेध

पुंडलिक आंबटकर

# सशक्त भारताची तटस्थ भूमिका

सध्या जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले आहे. २४ फेब्रुवारी २०२२ पासून रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू आहे. आता अमेरिका आणि इस्रायलने इराणशी युद्ध छेडले आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्यासह ४८ प्रमुख नेते, ४० लष्करी कमांडर आणि डझनभर वरिष्ठ अधिकारी मारले गेले. वास्तविक या युद्धाशी भारताचा कुठलाही संबंध नाही. परंतु, तरीही भारतातील अनेक ठिकाणी आंदोलने सुरू आहेत. भारत सरकारने याबाबत हस्तक्षेप करावा, अशी मागणी काही मुस्लिमांकडून करण्यात येत आहे. विरोधी पक्षांनीही या प्रकरणी रान उठवून आगीत तेल ओतले आहे. खामेनी यांच्यावरील हल्ल्याबाबत संसदेत चर्चा घडवून आणावी, अशी या लोकांची मागणी आहे. परंतु, बांगलादेशात हिंदूंची सरेआम कत्तल करण्यात आली तेव्हा यांनी तोंडातून एक शब्दही काढला नव्हता. पहलगाम हल्ल्यात २७ हिंदूंची धर्म विचारून निर्घृण हत्या करण्यात आली तेव्हा हे आंदोलक कुठे होते? खामेनी यांच्या बाजूने एकही मुस्लिम राष्ट्र उभे नसताना भारताने यात का म्हणून हस्तक्षेप करावा? भारताने आधीच स्पष्ट केले आहे की, हा काळ युद्धाचा नाही. भारत आज विकासाच्या मार्गावर वेगाने अग्रेसर झालेला आहे. अशा परिस्थितीत कुठल्याही प्रकारचे युद्ध देशाला मागे घेऊन जाणारे ठरू शकते. त्यामुळे भारताने कुठल्याही जागतिक संघर्षाच्या स्थितीत सदैव तटस्थ राहण्याची भूमिका निवडली आहे.



शिया आणि सुन्नी यांच्यातील विस्तव जात नसताना भारतासारख्या हिंदू राष्ट्राने या प्रकरणात दखल तरी का द्यावी? इराण आपला मित्र देश असल्याचे काही आंदोलक सांगत आहेत. परंतु, इराणने भारतासोबत नेमकी कोणती मैत्री निभावली, हे एकदा या लोकांनी स्पष्ट करून सांगितले पाहिजे. खामेनी यांनी ३६ वर्षांच्या सत्तेत इराणमध्ये कठोर हुकूमशाही राबवून जनतेवर प्रचंड अत्याचार केले. १९९९ चे विद्यार्थी आंदोलन, २००९ चे ग्रीन मुव्हमेंट आणि २०२२ मध्ये हिजाबविरोधी निदर्शने करणाऱ्यांचा प्रचंड छळ करण्यात आला. अशा परिस्थितीत खामेनी मुस्लिमांचे रहबर अर्थात धर्मगुरू कसे काय ठरू शकतात?

अवघ्या १६ वर्षांच्या निराधार मुलीला भरचौकात फाशी देणाऱ्या व्यक्तीस धर्मगुरू म्हणून गौरविणे, हे न समजण्यापलीकडचे आहे. खामेनीच्या इशाऱ्यावरून २०२२ मध्ये हजारो आंदोलकांना गोळ्या घालण्यात आल्या. त्यामुळेच खामेनीच्या खातम्यानंतर इराणमध्ये महिला व मुली आनंद साजरा करीत असताना भारतातील काही लोकांना मात्र प्रचंड दु:ख झाले आहे! अलिकडे नवी महासत्ता म्हणून भारताचा उदय झाला आहे. सशक्त भारताला परम् वैभवापर्यंत नेण्याचा संकल्प सरकारचा आहे. यासाठी २०४७ पर्यंतचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. महाराष्ट्र सरकारने नुकताच आपला ७.६९ लाख कोटींचा अर्थसंकल्प सादर केला. विशेष म्हणजे, महायुती सरकारने २०४७ पर्यंत महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलर्सची महासत्ता करण्याचा संकल्प सोडला आहे. यासाठी सरकारने प्रत्येक क्षेत्राचे योगदान निर्धारित केले आहे. एका अहवालात आगामी २० ते २५ वर्षांत भारत ३० ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा गाठेल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ही बाब अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राला मान्य नसल्यानेच भारताच्या मार्गात अडथळा आणण्याचे प्रयत्न होत आहे.

उमेरिकेचे उपविदेशमंत्री ख्रिस्तोफर लँडो भारताची वाढती अर्थव्यवस्था पाहून खूपच अस्वस्थ झालेले आहेत. 'आम्ही २० वर्षांपूर्वी चीनबाबत ज्या चुका केल्या त्या भारताबाबत होऊ देणार नाही!' अशी खदखद त्यांनी बोलून दाखविली आहे. भारताचा आर्थिक उदय अमेरिका ठरवू शकत नाही. भारत आपला मार्ग शोधण्यासाठी सक्षम आहे. आगामी काळात श्रीमंत राष्ट्रांकडून भारताच्या प्रगतीत खोडा घालण्याचे प्रयत्न नक्कीच होणार आहे आणि त्यामुळेच भारताने कुठल्याही युद्धजन्य स्थितीत तटस्थ राहण्याचा मार्ग निवडला आहे. रशिया आणि इस्रायलने सदैव भारताची पाठराखण केली आहे. त्यामुळे हे दोन देश भारताचे सच्चे मित्र होय. परंतु, रशिया आणि इस्रायलमध्ये वैमनस्य आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीच कोणाचा कायमचा शत्रू अथवा मित्र नसतो, असे म्हटले जाते. परंतु, अमेरिकेला जगावर अधिराज्य राखायचे असल्याने या देशाला नवीन स्पर्धक नको आहेत. त्यामुळे भारताला व्यापारिक समतोल राखूनच पुढे जावे लागणार आहे. अशा परिस्थितीत सरकारची तटस्थ भूमिका सशक्त भारताची पावती देणारी ठरत आहे.

९८८१७१६०२७

## प्रासंगिक

डॉ. दीपक शिकारपूर

# अर्थसंकल्प २०२६ : डिजिटल पॉवर हाऊस

मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६ मार्च २०२६ रोजी सादर केलेला राज्याचा अर्थसंकल्प हा महाराष्ट्राला 'ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी'कडे नेणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या अर्थसंकल्पाने केवळ कृषी आणि पायाभूत सुविधांवरच भर दिला नाही, तर माहिती तंत्रज्ञान, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स आणि शाश्वत ऊर्जेवर आधारित 'ग्रीन डेटा सेंटर्स'च्या माध्यमातून राज्याच्या औद्योगिक नकाशात आमूलाग्र बदल घडवण्याचे ध्येय ठेवले आहे.

**१. नवीन आयटी आणि एआय विभागाची स्थापना** : तंत्रज्ञान क्षेत्रातील वेगाने होणारे बदल लक्षात घेऊन, सरकारने स्वतंत्र 'इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विभाग' स्थापन करण्याची घोषणा केली आहे. या विभागासाठी स्वतंत्र आयुक्तालय असेल, ज्यामुळे धोरणात्मक निर्णय घेणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे अधिक वेगवान होईल. तसेच, सरकारने ओनल आणि सर्वामलसारख्या जागतिक संस्थांशी सामंजस्य करार करून राज्याला एआय संशोधनाचे केंद्र बनविण्याचे पाऊल उचलले आहे.

**२. ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स : चार लाख नोकऱ्यांचे उद्दिष्ट** : 'महाराष्ट्र ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर पॉलिसी २०२५' च्या माध्यमातून राज्याने देशात जीसीसी क्षेत्रात नेतृत्व करण्याचे ठरवले आहे.

**लक्ष्य** : राज्यात ४०० नवीन जीसीसी केंद्रे स्थापन करणे.

**रोजगार** : या माध्यमातून पुढील काही वर्षांत चार लाख उच्च-कौशल्य नोकऱ्या निर्माण केल्या जातील.

**पुणे शहराचे महत्त्व** : पुणे हे सध्या देशातील जीसीसीसाठी सर्वाधिक पसंतीचे ठिकाण ठरत आहे. बँकिंग, फायनान्स, ऑटोमोटिव्ह आणि इंजिनीअरिंग क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांचे हे 'कॅप्टिव्ह तंत्रज्ञान केंद्र' म्हणून उदयास येत आहे.

**विकेंद्रीकरण** : मुंबई-पुण्यासोबतच आता नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या शहरांमध्येही जीसीसी क्लस्टर्स विकसित केले जाणार आहेत.

**३. ग्रीन डेटा सेंटर्स आणि अक्षय ऊर्जा** : डेटा सेंटर्स हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे कणा आहेत, परंतु ते मोठ्या प्रमाणात वीज वापरतात. यावर उपाय म्हणून महाराष्ट्र सरकारने 'ग्रीन डेटा सेंटर' धोरणाला चालना दिली आहे.

**स्वतंत्र वीज निर्मिती** : डेटा सेंटर पार्कना आता स्वतःचा अक्षय ऊर्जा (सौर, पवन किंवा जलविद्युत) प्रकल्प उभारण्याची आणि वीज वितरित करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

**नागपूर येथे प्रगत डेटा सेंटर** : राज्याचा सार्वभौम डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी नागपूरमध्ये एक 'स्टेट-ऑफ-द-आर्ट' डेटा सेंटर उभारले जाणार आहे.

**शाश्वतता** : उद्योगांना कमी दरात हिरवी वीज (ग्रीन एनर्जी) उपलब्ध करून देऊन महाराष्ट्राला आशिया-पॅसिफिकमधील प्रमुख डिजिटल हब बनविण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

**४. पुणे** : भविष्यातील जागतिक तंत्रज्ञान केंद्र : पुणे शहरासाठी या अर्थसंकल्पात विशेष तरतुदी आहेत. आयटी कॉरिडॉरमधील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी भूमिगत बोगदे बांधण्याची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई-पुणे हाय-स्पीड रेल्वे आणि मेट्रो विस्तारामुळे पुण्याची कनेक्टिव्हिटी वाढून नवीन गुंतवणुकीला चालना मिळेल.

**५. रोजगार आणि कौशल्य विकास** : केवळ तंत्रज्ञान आणून उपयोग नाही तर त्यासाठी लागणारे मनुष्यबळ तयार करण्यासाठी सरकारने '३६ नवदिशा केंद्र' स्थापन करण्याची घोषणा केली आहे. हे केंद्र तरुणांना परदेशातील नोकऱ्यांसाठी आवश्यक भाषा कौशल्ये आणि तांत्रिक प्रशिक्षण देतील. तसेच, 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक' आणि 'ॲग्रिस्टॅक' सारख्या योजनांतून ग्रामीण भागातही तंत्रज्ञानावर आधारित रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

**६. स्टार्टअप इकोसिस्टिम** : 'मुख्यमंत्री महाफंड' आणि ५०,००० स्टार्टअप्स : सरकारने महाराष्ट्राला देशाची 'स्टार्टअप राजधानी' बनविण्यासाठी 'महाराष्ट्र स्टार्टअप आणि नावीन्यता धोरण २०२५' ला गती दिली आहे. मुख्यमंत्री महाफंड (५०० कोटी) : नवीन उद्योजकांना सुरुवातीच्या टप्प्यावर आर्थिक बळ देण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. यातून पात्र स्टार्टअप्सना ५ ते १० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज अत्यंत कमी व्याजदरात उपलब्ध होईल.

**लक्ष्य** : पुढील ५ वर्षांत १.२५ लाख उद्योजक तयार करणे आणि ५० हजार नवीन स्टार्टअप्सना अधिकृत मान्यता मिळवून देणे.

**कौशल्य आधारित निवड** : तांत्रिक शिक्षण घेतलेल्या ३० लाख तरुणांमधून एआय-आधारित चाचण्या आणि हॅकाथॉनद्वारे २५ हजार सर्वोत्तम उमेदवारांची निवड करून त्यांना सरकार थेट पाठबळ देईल.

**पेटंट साहाय्य** : भारतीय पेटंटसाठी ५ लाख आणि आंतरराष्ट्रीय पेटंटसाठी २० लाख रुपयांपर्यंतची मदत देऊन 'बौद्धिक संपदा' निर्मितीला प्रोत्साहन दिले जाईल.

**७. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स** : धोरणात्मक भागीदारी : महाराष्ट्र हे एआय दत्तक घेणारे देशातील पहिले राज्य ठरत आहे. अर्थसंकल्पात जाहीर केल्याप्रमाणे : जागतिक भागीदारी ओपनेआय आणि सर्वमेआय (भारतीय भाषांसाठी एआय विकसित करणारी संस्था) यांच्यासोबत सरकारने करार केले आहेत.

**'शिक्षा साथी' एआय टूल** : अंगणवाडी सेविकांसाठी एआय-आधारित चॅटबॉट लाँच करण्यात आला आहे, जो मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन करेल.

**८ . फ्रंटियर टेक्नॉलॉजी आणि पुण्याचे महत्त्व** : पुणे हे केवळ आयटी हब न राहता आता 'डीपटेक' आणि 'क्वांटम कॉम्प्युटिंग'चे केंद्र म्हणून विकसित केले जात आहे. पुण्यात जागतिक दर्जाचे ३-४ 'जीसीसी पार्क' उभारले जातील, जिथे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे संशोधन केंद्र असतील.

**एव्हीजीसी-एक्सआर पॉलिसी** : ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्रातील स्टार्टअप्ससाठी विशेष सवलती जाहीर केल्या आहेत, ज्याचा मोठा फायदा पुण्यातील आयटी कंपन्यांना होईल.

**आयआयटी बॉम्बेसोबत सहकार्य** : उदयोन्मुख तंत्रज्ञानामध्ये संशोधनासाठी आयआयटी बॉम्बे आणि 'भारतजेन' सोबत सामंजस्य करार करण्यात आले आहेत. २०२६ चा हा अर्थसंकल्प विकसित महाराष्ट्र २०४७ च्या दिशेने टाकलेले एक धाडसी पाऊल आहे. आयटी आणि जीसीसी धोरणामुळे महाराष्ट्रातील तरुणांना जागतिक स्तरावरील संधी उपलब्ध होतील, तर ग्रीन डेटा सेंटर्समुळे पर्यावरणाचे रक्षण करत औद्योगिक प्रगती साधता येईल. पुण्यासारखी शहरे या नवीन डिजिटल क्रांतीची प्रमुख केंद्रे म्हणून उदयास येतील, यात शंका नाही.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत)

### डिजिटल आवृत्ती सुधारणा

डिजिटल युगात ऑनलाईन आवृत्ती अधिक सुलभ आणि अद्ययावत असणे आवश्यक आहे. तरुण भारतचे मोबाईल ॲप आणि ई-पेपर अत्यंत वाचकप्रिय आहे. त्यावर सातत्याने अपडेटेड बातम्या येतील याची अपेक्षा आहे. तसेच व्हिडीओवर भर द्यावा, ही विनंती.

**अपेक्षा पुराणिक**/पुणे

### तरुण भारतचे स्वागत

पुण्यात आपल्या आवृत्तीचा शुभारंभ झाला, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेतून प्रेरित पत्रकारिता समाजात सकारात्मक परिवर्तन घडवू शकते. आज माध्यम क्षेत्रात वेगवान बातम्यांच्या शर्यतीत अनेकदा सत्य मागे पडते. अशा वेळी अभ्यासपूर्ण, राष्ट्रहिताला प्राधान्य देणारे आणि संस्कारक्षम लेखन करणारे व्यासपीठ आवश्यक आहे. स्थानिक प्रश्नांबरोबरच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विषयांवरही स्पष्ट भूमिका मांडावी. पुणेकर वाचकांचा विश्वास जिंकत ही आवृत्ती लवकरच लोकप्रिय होईल, असा विश्वास आहे.

**विद्या साळुंखे**/पुणे

### ही सारी काँग्रेसचीच देण

भारत-अमेरिका दरम्यान झालेल्या व्यापारिक करारावर काँग्रेस नेते शेतकऱ्यांबद्दल जो कळवळा दाखवत आहे ते पाहता मन भरून आले. काय वाईट परिस्थिती आणली आहे नियतीने. विदेशी शेतकरी जे तंत्रज्ञान वापरून कृषी उत्पादनांची आपल्या भारत देशात स्वस्तात निर्यात करू शकतात ते तंत्रज्ञान भारतीय शेतकऱ्याला मिळू न देण्याचे धोरण राबविणारी काँग्रेस आजही सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करून अडून बसली आहे. तीच काँग्रेस आज शेतकऱ्यांवर अन्याय झाला म्हणून ओरडत आहे. याला काय म्हणावे ? जयराम रमेश यांनी परकीय उत्पादन आयात करून विदेशी राष्ट्रांच्या हितासाठी शेतीत तंत्रज्ञान वापराला बंदी घातली. इथल्या शेतकऱ्यांचे नुकसान करून त्यांचे आर्थिक नुकसान केले. या अगोदर कृत्रिम धाग्याची आयात करून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कर्जात बुडवले. शेती करणाऱ्या काँग्रेसी समर्थकांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या पक्षाच्या नेत्यांना तंत्रज्ञान मिळू न देण्याच्या धोरणाबद्दल जाब विचारावा.

**जयंत बापट**/७२६३०८९२०४

## वाचक पत्रे

### विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करावे

पुणे हे शिक्षणाचे केंद्र मानले जाते. देशभरातील विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. अशा शहरात तरुण भारतने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना विशेष प्राधान्य द्यावे. प्रवेशप्रक्रिया, स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती, तसेच करीअर मार्गदर्शन यावर नियमित माहिती असावी. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करणारे लेखही आवश्यक आहेत. युवा पिढी राष्ट्रनिर्मितीची ताकद आहे. त्यांना योग्य दिशा देण्याचे काम तरुण भारतने करावे.

**गजानन तेली**/पुणे

### धर्माचा चष्मा आणि सोयीस्कर मौन

देशाची राजधानी दिल्लीतील उत्तम नगर परिसरात नुकतीच एक धक्कादायक आणि माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली. होळीचा रंग एका लहान मुलीकडून अनवधानाने उडाला, म्हणून तिच्या वडिलांची हत्या जिहादी मानसिकतेच्या टोळक्याने केल्याची बातमी ऐकली. दिल्लीत दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेने संपूर्ण देश हादरला असला, तरी राजकीय वर्तुळ आणि तथाकथित विचारवंत या घटनेबाबत सोयीस्कर मौन बाळगून आहेत. रंग खेळताना अनवधानाने रंग उडाला, यासारख्या क्षुल्लक कारणावरून एका तरुणाला गाठून त्याचा जीव घेणे, ही केवळ गुन्हेगारी नसून ती एका विशिष्ट द्वेषमूलक मानसिकतेचे दर्शन घडवते. पीडित तरुण आपल्या कुटुंबाचा आधार होता; परंतु त्याच्या हत्येने एका हिंदू कुटुंबाचा आधार आज कायमचा हिरावला गेला आहे. जेव्हा हीच घटना उलट्या क्रमाने घडते, तेव्हा लोकशाही धोक्यात आहे किंवा असहिष्णुता वाढली आहे असा टाहो फोडणारे राहुल गांधी, प्रियांका गांधी यांच्यासह डावे विचारवंत, सिने कलाकार, मानवाधिकारवादी ही सगळी मंडळी आज मात्र या घटनेवर चकार शब्दही काढायला तयार नाहीत. अन्यायाला धर्माचा चष्मा लावून पाहिले जात असेल, तर याला सर्वधर्मसमभाव म्हणायचे का? हा महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. आजही काश्मीरमधील हिंदू आपल्याच देशात विस्थापित म्हणून जगत आहेत. त्यांच्या हक्कांवर आणि त्यांच्यावर झालेल्या अन्यायावर काँग्रेसचे भाऊ-बहीण, फारुख अब्दुल्ला, मेहबुबा मुफ्ती, डावी मंडळी आजही ब्र काढत नाहीत. दिल्लीतील या हत्याकांडातील दोषींना कठोरात कठोर आणि फाशीची शिक्षा मिळावी यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी एकमुखाने आवाज उठवणे गरजेचे होते. कायद्याचे राज्य हे केवळ कागदावर नसून ते कृतीत दिसायला हवे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



बीड : पात्रुड येथील श्री ह. प. भगवान बाबा गायकवाड यांनी नुकतीच नर्मदा परिक्रमा यात्रा पूर्ण केल्याने त्यांचा सत्कार करताना जयसिंग सोळंके, एकनाथ मस्के, अर्जुन नाईकनवरे, शंतनू सोळंके, रोहन घाडगे, घनश्याम भुतडा, माऊली नाटकर, चंद्रकांत गोमचाळे दिसत आहेत

## दीनदयाल शोध संस्थान जन शिक्षण संस्थान बीड येथे जागतिक महिला दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न

# स्वतःमध्ये बदल करा परिस्थिती नक्कीच बदलते : डॉ. मधुराताई कुलकर्णी

तभा. वृत्तसेवा

**बीड** | कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने दीनदयाल शोध संस्थान चक्रधर नगर पांगरी रोड बीड येथे जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी बोलताना डॉ. मधुराताई कुलकर्णी म्हणाल्या की, व्यक्तीच्या ताणा मुळे संपूर्ण जीवनशैली बदलते व त्याचा परिणाम कामावर होतो. परिस्थिती, व्यक्ती ,वस्तू यामुळे शारीरिक व मानसिक ताण तयार होतो. बऱ्याच वेळा इतरांना प्रतिक्रिया देण्याच्या भावनेने सुद्धा ताण निर्माण होतो. ताण कमी करण्यासाठी पॉज हा महत्त्वाचा असतो आपल्या मनावर ताण आला, हे लक्षात येताच क्षणभर थांबा, सकारात्मक विचार करा, व स्वत:मध्ये बदल करण्याचा प्रयत्न करा. स्वत:मध्ये बदल केला की परिस्थिती आपोआप बदलते. व्यक्तीच्या मनावरील ताण कमी करण्यासाठी डॉ.सौ मधुराताई कुलकर्णी यांनी दैनंदिन जीवनातील सोपी सोपी उदाहरणे देऊन हा विषय सांगितला.



महिला उद्योजिकांचा सन्मान

बीड शहरातील अनेक महिलांनी आपल्या उद्योगाच्या माध्यमातून स्व कर्तृत्व सिद्ध केले आहे. यातील सौ दिपाली दिनेश कुलकर्णी, अनिता प्रवीण केटे व उषा चंद्रकांत मिरकर या महिला उद्योजकांचा सन्मान करण्यात आला.

या तीनही महिला उद्योजकांनी अतिशय कठीण परिस्थितीतून आपल्या उद्योगाला भरभराटीत आणून समाजासमोर एक विशेष आदर्श ठेवला आहे असे त्यांच्या मनोगतातून लक्षात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दीनदयाल शोध संस्थानचे बीड जिल्हा प्रकल्प प्रमुख डॉ. उपेंद्र जी कुलकर्णी हे होते तर विशेष उपस्थिती म्हणून डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरचे प्र. कुलगुरू डॉ.वाल्मीक जी सरोदे हे होते. जन शिक्षण संस्थानच्या प्रबंध समिती उपाध्यक्ष डॉ. सत्यभामा चोले, नानाजी देशमुख विद्यामंदिर शालेय समिती सचिव डॉ. सीमा जोशी, मधुरा कुलकर्णी,सुनंदा कुलकर्णी, रवीकाका देशमुख,अनिता वजूरकर, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या निवृत्त संचालिका अंजली मॅडम जन शिक्षण संस्थान बीड चे संचालक श्री गंगाधर जी देशमुख यांची उपस्थिती होती.

यशोगाथा सन्मान

जन शिक्षण संस्थान बीड द्वारा २००४ पासून ४५ हजार पेक्षा अधिक लोकांना विविध कौशल्य विषयक प्रशिक्षण दिले असून सरासरी ३५ ते ४० टक्के यशोगाथांचे प्रमाण आहे. त्यापैकी प्राथमिक स्वरूपात आठ यशोगाथांचा सन्मान करण्यात आला.

विविध स्पर्धा

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने केज धारूर माजलगाव गेवराई शिरूर बीड नवगण राजुरी इत्यादी ठिकाणी संगीत खुर्ची उखाणे, यासारख्या स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धेमध्ये २४० महिलांनी सहभाग घेतला असून प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या गुणवंत प्रशिक्षणार्थींना आकर्षक पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

प्रशिक्षिका सन्मान

प्रशिक्षिका हा जन शिक्षण संस्थानचा महत्त्वाचा घटक आहे. वाडी, वस्ती तांड्यापर्यंत इतकेच काय अतिदुर्गम भागापर्यंत प्रशिक्षणाची गंगा पोहोचविण्याचे काम या प्रशिक्षिका करत आहेत. मान्यवरांच्या हस्ते ४५ प्रशिक्षिकांचा सन्मान करण्यात आला.

कार्यकर्त्या व शिक्षिकांचा सन्मान

समर्पित कार्यकर्ते हीच दीनदयाल शोध संस्थान च्या कार्याची ओळख आहे. संस्थेच्या कार्यात असलेला कार्यकर्ता व शिक्षक हा घटक कसा आहे यावरून संस्थेची ओळख निर्माण होते. अशा समर्पित महिला कार्यकर्त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आज महिला केवळ पुरुषांच्या बरोबरीने नसून एक पाऊल पुढे आहेत, प्रत्येक क्षेत्रात महिलांनी पदार्पण केल्याचे अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत. बीड सारख्या ठिकाणी उद्योजकीय क्षेत्रात महिलांचे स्थान विशेष उल्लेखनीय असल्याचे मला पहावयास मिळाले असे मत प्र कुलगुरू डॉ वाल्मीक जी सरोदे यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय मार्गदर्शन प्रसंगी डॉ उपेंद्रजी कुलकर्णी यांनी उत्साहवर्धक कार्यक्रमाचे कौतुक करून जन शिक्षण संस्थांच्या यशोगाथा कडून खूप काही शिकण्यासारखे असल्याचे सांगितले. तसेच सन्मान हे पुढील दिशा गाठण्यासाठी असतात, यशोगाथांचा सन्मान मधून ईश्वरी संकेत मिळतो. तसेच काम करणाऱ्यालाच अडचणी येतात आणि अडचणीतूनच मार्ग निघत असतो असेही डॉ.उपेंद्र भाऊ कुलकर्णी म्हणाले.

**सेल्फी पॉईंट विशेष आकर्षण** | सन्मान कर्तृत्वाचा ही थीम घेऊन कार्यक्रमाच्या प्रांगणात सुंदर अशी सजवलेली सेल्फी पॉईंट ची व्यवस्था केल्यामुळे सर्वच महिलांनी आपापली सेल्फी घेऊन महिला दिन साजरा केला.

**प्रमाणपत्र वितरण** | मागील सहा महिन्यात असिस्टंट ड्रेस मेकर, ब्युटी केअर असिस्टंट, असिस्टंट हॅन्ड एम्ब्रॉयडर या पूर्ण झालेल्या प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

कार्यक्रमासाठी जिल्हाभरातून ३५० महिलांची उत्स्फूर्त उपस्थिती होती. प्रास्ताविकच्या माध्यमातून दीनदयाळ संस्थान, जन शिक्षण संस्थाच्या कार्याची माहिती देऊन कार्यक्रमाची रूपरेषा संचालक श्री गंगाधर जी देशमुख यांनी सांगितली. ग्रामोदय गीत सौ स्नेहल केवडकर यांनी सादर केले,सूत्रसंचलन सहायक कार्यक्रम अधिकारी श्री सुदाम पालकर यांनी केले तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री धर्मराज जाडकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जन शिक्षण संस्थान बीडच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## ऐश्वर्या लिखे यांचा बिझनेस आयकॉन पुरस्काराने सन्मान



तभा. वृत्तसेवा

**परळी** | रिसील प्रस्तुत महाराष्ट्र बिझनेस आयकॉन २०२५ हा मानाचा पुरस्कार परळी येथील तरुण उद्योजिका आणि प्राणीप्रेमी ऐश्वर्या रामचंद्र लिखे यांना प्रदान करण्यात आला. नाशिक येथे पार पडलेल्या एका सोहळ्यात प्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते हा गौरव करण्यात आला.

ऐश्वर्या लिखे गेल्या वर्षांपासून परळीसह संपूर्ण मराठवाड्यात प्राणीप्रेमी म्हणून सक्रिय आहेत. त्यांनी केह चॅरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून कोणत्याही बाह्य आर्थिक मदतीशिवाय केवळ स्वतःच्या कुटुंबाच्या जोरावर आतापर्यंत ५ हजार पेक्षा जास्त मुक्या प्राण्यांची सेवा केली आहे. याच प्राण्यांच्या मदतीसाठी आणि उपचारांच्या खर्चासाठी त्यांनी व्यवसायाची वाट निवडली.निसर्ग आणि प्राण्यांच्या ओढीपोटी ऐश्वर्या यांनी मीरा इन्सेन्स या स्टार्टअपची सुरुवात केली. मंदिरांमध्ये देवाला अर्पण केलेली आणि नंतर निर्माल्य म्हणून टाकून दिली जाणारी फुले जमा करून, त्यावर प्रक्रिया करून सुगंधी धूप आणि अगरबत्ती तयार केली जाते. या माध्यमातून त्या प्राणी सेवा करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र बिझनेस आयकॉन २०२५ हा मानाचा पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले.

## राज्यस्तरीय नेतृत्त्व गुणविकास शिबिरामध्ये सक्रिय सहभाग घेतल्याने नंदिनी गर्गे चा सत्कार संपन्न



तभा. वृत्तसेवा

**माजलगाव प्रतिनिधी** | सुंदरराव सोळंके महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. गर्गे नंदिनी नारायण हिने पुणे येथे राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुणे येथे प्रेरणा २०२५-२६ राज्यस्तरीय नेतृत्त्व गुणविकास शिबिरामध्ये सक्रिय सहभाग नोंदविल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले. कु.नंदिनी गर्गे हिच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. के.मुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे, डॉ के बी गंगने, डॉ.महेंद्र वानखडे, प्रा. श्रीनिवास मोतेकर,डॉ. नितीन ढवळे, डॉ. सतीश डाके, डॉ. सुदर्शन स्वामी यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते.

## शेतकरीहिताचा आणि विकसित महाराष्ट्राचा अर्थसंकल्प – शंकर देशमुख

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला बळ देणारा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला महाराष्ट्र राज्याचा २०२६–२०२७ चा अर्थसंकल्प हा सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि युवकांसाठी दिलासा देणारा व विकासाभिमुख आहे. या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान ही अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक घोषणा आहे. या निर्णयामुळे मराठवाड्यासह बीड जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. तसेच ग्रामीण पायाभूत सुविधा, उद्योगविकास आणि रोजगारनिर्मितीसाठी करण्यात आलेल्या तरतुदींमुळे बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला नवी गती मिळणार आहे. महायुती सरकार विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी कटिबद्ध असून या लोकहितवादी अर्थसंकल्पाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि राज्य सरकारचे मनःपूर्वक अभिनंदन.

शंकर देशमुख, जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, बीड

# स्वंय प्रेरणा मनातील इच्छा शक्ती व दृढनिश्चय ध्येय साध्य करताना उपयोगी पडते - पूजा खडकीकर

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी )** | जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प .दीन दयाल शोध संस्थान बीड मध्ये .विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या बीड शहरातील मातृशक्तीचा सन्मान अखिल भारतीय इतिहास संकलन योजना नवी दिल्ली संलग्न इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र देवगिरी प्रांत बीड जिल्हा शाखा वतीने आयोजित करण्यात आला. या सन्मान सोहळ्याचे अध्यक्ष स्थानी मा पुजाताई खडकीकर (उप प्रादेशिक परिवहन अधिकारी बीड व प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री गंगाधर देशमुख (पं दीनदयाळ शोध संस्थान बीड )



मातृशक्ती मध्ये सौ. मनिषा भाऊराव पवार (वृध्दाश्रम सेवा ) सौ. मयुरी सुरेश राजहंस (सेवाश्रम) सौ. उमा सुनील औटे (गो सेवा), सौ. मुकता राम चौधरी ( रुग्ण अन्नदान) व सौ. आशा गणेश देशपांडे ( स्वंय उद्योजिका) यांचा भव्य सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास संकलन संस्था बीड सचिव श्रीकृष्ण जोशी यांनी केले . सूत्र संचालन अत्यंत प्रभावीपणे व विविध काव्यांचा आधार घेत सौ शारदा मुकुंद कुलकणी यांनी केले .

या समारंभात सत्कार मुर्ती नी आपले मनोगते व्यक्त केली त्यातून आपल्या कामाचा आलेख सर्व महिला व बंधुसमोर मांडला. सर्वांनी त्याच्या कामाचा आधार बनावे असे आवाहन केले. नविन पिढीसमोर अत्यंत आदर्श विचार या कार्यक्रमात समोर आले. कुटूंबाची संकल्पना व्यापक करण्याची गरज व्यक्त झाली. अध्यक्षीय समारोप करताना मा. पुजा ताई खडीकर यांनी स्वतः या सर्व सत्कार पूर्तीच्या कार्याचा उल्लेख केले व स्वतः या भेट देण्याची इच्छा व्यक्त केली, स्वतः च्या जडणघडण मध्ये व आपल्या आई चे, बन्धुन्चे, घरातील सर्वांचे आपल्या यशस्वी वाटचालीतील योगदान आहे व त्यांच्या कष्टांमुळे मी समाजासाठी सेवा देण्यास सक्षम झाल्याचे विशद केले. तसेच स्वंय प्रेरणा मनातील इच्छा शक्ती व दृढनिश्चय ध्येय साध्य करताना उपयोगी पडते . विविध क्षेत्रातील सर्व महिलाचे कार्य समाजास प्रेरणादायी आहे.

हा सोहळा अतिशय उत्साहाच्या वातावरणात व शेकडो महिला व बंधुच्या उपस्थितीत पार पडला आभार प्रदर्शन कार्याध्यक्ष श्री. महेश मोटे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पं .दीनदयाल शोध संस्थान सर्व पदाधिकारी, व इतिहास संकलन संस्था समिती बीड जिल्हा अध्यक्ष जयंत अकोलकर, सचिव श्रीकृष्ण जोशी सह सचिव श्री सुनिल मोगरकर, संघटन सचिव श्री मुकुंद कुलकर्णी, प्रा- शशिकांत पसारकर देवगिरी प्रांत कोषाध्यक्ष, प्रा सुहास जोशी संजय डोळे महेश मोटे सौ. कविता जोशी, सौ वर्षाताई पसारकर,श्री. प्रमोद कुलकर्णी सर्व जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## लोकमान्य टिळक विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जागतिक महिला दिनानिमित्त पोखरी गावातील कर्तृत्ववान शेतकरी महिला भगिनींचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकमान्य टिळक विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुणराव पत्की, पोखरी गावच्या उपसरपंच श्रीमती. सुशीलाबाई निकम, ग्रामपंचायत सदस्या श्रीमती.शैनाबी शेख, तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून सौ.प्रणीता धोंड मॅडम, राजमाता जिजाऊंच्या वेशभूषेत कु. दुर्गा निकम व्यासपीठावर उपस्थित होते.



मान्यवरांच्या हस्ते भारत माता ,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

तसेच सर्व मान्यवरांचा पुष्प व पुस्तिका देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर मान्यवरांच्या हस्ते गावातील कर्तृत्ववान शेतकरी महिला भगिनींचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना सौ.धोंड मॅडम यांनी गावातील सर्व महिलांनी एकजुटीने राहून महिलांच्या प्रश्नांवर जागरुकता दाखवणे गरजेचे आहे, शिक्षणाबरोबरच लहान मुलींवर चांगले संस्कार करणे आवश्यक असून आपले चारित्र्य हाच आपला अनमोल दागिना आहे याला जपत आपले आरोग्य सांभाळावे, बालविवाहाची अनिष्ट प्रथा बंद पडली पाहिजे असे मोलाचे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप करताना अरुण पत्की सरांनी जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देताना महिलांची पूर्वीची परिस्थिती व सध्याच्या परिस्थिती या विषयी माहिती देताना महिलांनी प्रत्येक क्षेत्रात अत्युच्च कामगिरी केली आहे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. विद्या निकम, प्रास्ताविक कु.प्रिया बळवंत,आभारप्रदर्शन व कल्याणमंत्र कु.गायत्री होळकर हिने आभार सादर केला.

## माजलगावच्या माहेश्वरी महिला मंडळाचा स्तुत्य उपक्रम:

# ७५ वर्षांवरील ज्येष्ठांचा सन्मान आणि होळीचा उत्साह!



तभा. वृत्तसेवा

**माजलगाव (प्रतिनिधी)** | येथील माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिन आणि होळीचे औचित्य साधून एका दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमात समाजातील ७५ वर्षांवरील ज्येष्ठ महिलांचा सन्मान करून त्यांच्या अनुभवांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची मंगलमयी सुरुवात प्रमुख पाहुण्या डॉ. काकानी मॅडम व बीड जिल्हा उपाध्यक्ष सौ. वर्षा भक्कड़ आणि सहसचिव सौ. माया चांदक यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी बोलताना वक्त्यांनी महिलांच्या समाजातील अमूल्य योगदानावर प्रकाश टाकला.

सोहळ्याला उपस्थित प्रमुख अध्यक्षा: अलकनंदा मानधन, उपाध्यक्ष: वर्षा बजाज, सचिव: अनिता मुंधडा , सहसचिव: सुगुणा तेला, कोषाध्यक्ष: किरण कासट, सहकोषाध्यक्ष: सुरेखा जेथलिया, संघटन मंत्री: रत्नमाला इंदाणी यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी स्नेह संपदा समितीच्या सदस्यांची देखील उपस्थिती होती. ७५ वर्षांवरील माऊलींच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांचा झालेला यथोचित सन्मान हा या कार्यक्रमाचे खरे यश ठरले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी होळीचा सण पारंपरिक उत्साहात साजरा केला. हा संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी माहेश्वरी महिला मंडळाच्या सर्व सदस्यांनी अहोरात्र कष्ट घेतले. माजलगाव शहरात या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## तळेगावला १४ मार्च रोजी समाधान शिबिराचे आयोजन, पूर्वतयारी पूर्ण

**बीड** | महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा लाभथेट ग्रामीण भागातील गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी दि. १४ मार्च रोजी सकाळी १० वाजता तळेगाव येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या शिबिराची पूर्वतयारी पूर्ण झाली असून, प्रशासनाकडून ग्रामस्थांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून शिबिराचे महत्त्व विशद केले. या शिबिरात वारसा हक्क नोंदणी, नवीन मतदार नोंदणी, घरकुल योजना, आयुष्यमान भारत, संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान आणि विद्यार्थ्यांसाठी विविध दाखल्यांचे वाटप जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सरपंच उद्धव घोलप यांच्या अध्यक्षतेखाली

# भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संस्कार देणारा कारखाना - नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी

### जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा सन्मान

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | भारतीय शिक्षण प्रसारक संस्था केवळ शिक्षण क्षेत्रात काम करते असे नव्हे तर सामाजिक दायित्वाचं कंगण हातात ठेवून विचार परंपरेने चालणारे कुलक्षेत्र आहे. माझ्या संपुर्ण आयुष्यात संस्थेचा आदर्श आणि शिकवण नेहमीच कामी आली. महिला दिनाचे औचित्य साधून घरकाम करणार्या कष्टकरी महिलांना संस्थेच्या खोलेश्वर महाविद्यालयात भेट वस्तू देवून सन्मान करण्याची परंपरा खर्या अर्थाने समाजाला आदर्श देणारी म्हणावी लागेल असे प्रतिपादन परळी शहराच्या नगराध्यक्ष सौ.पद्मश्री धर्माधिकारी यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. येथील खोलेश्वर महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती अनेक वर्षांपासून महिला दिनाचे औचित्य साधून रविवार, दिनांक ८ मार्च २०२६ रोजी शहरातील श्रमिक, कष्टकरी महिलांचा सन्मान केल्या जातो. यंदा घरकाम करणार्या कष्टकरी २७५ महिलांना भेट वस्तू



देवून मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. स्व. गोपीनाथराव मुंडे सभागृहात झालेल्या कार्यक्रम व्यासपीठावर नगरसेविका सौ.सुचिताताई देशपांडे, सौ.वर्षाताई मुंडे, सौ.पुजाताई कुलकर्णी, सौ.संगिताताई धर्माराव, सौ.अंकुश मॅडम आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ.दिपक फुलारी यांनी मागच्या अनेक वर्षापासून महाविद्यालयात महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात काम करणार्या कष्टकरी महिलांचा सन्मान करण्याचे भाग्य आम्हांला लाभते. संस्थेच्या मार्गदर्शनाखाली यंदा २७५ महिलांनी उपक्रमात सहभाग घेतला. पुढच्या वर्षी मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम घेणार असल्याचेही ते म्हणाले.

महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी यांनी सांगितले की, शिक्षण क्षेत्रात काम करताना सामाजिक बांधिलकी हे व्रत संस्थेचा मुळ आधार आहे. हिंदू संस्कृती रूढी, परंपरा विविध उपक्रम त्यासाठी संस्थेच्या विचारधारेखाली शिवाय पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनामुळे असे उपक्रम आम्ही हाती घेतो. आपल्या भाषणात पुढे बोलताना नगराध्यक्षा सौ.धर्माधिकारी यांनी संस्थेत बोलावल्याचा आनंद व्यक्त करताना स्पष्ट सांगितले की,संस्थेसोबत माझे नाते अंतरंग जन्मोजन्मीचे असून खर्या अर्थाने संस्था म्हणजे संस्कार देणारा आणि राष्ट्रभक्त घडविणारा कारखाना होय. माझे संपुर्ण शिक्षण संस्थेच्या सिद्धेश्वर संस्कार केंद्रात झाले. त्यामुळे सामाजिक दायित्व याची ओळख झाली. त्याचा फायदा मला परळीसारख्या शहराची सेवा करण्यासाठी होतो. महिला दिनानिमित्त खोलेश्वर महाविद्यालयाने स्तुत्य उपक्रम घेवुन शिक्षण संस्थेत नविन आदर्श दाखवून दिला. खर्या अर्थाने कष्टकरी, श्रमिक महिलांना सन्मान मिळवून देण्याची गरज असते. ज्यांच्या जीवावरच आपण लोक विश्वासाने संसार करीत असतो. स्त्री म्हणजे देवाचं वास्तव्य ज्यांच्या अंगी असतं. संकटे कितीही आली तरीही सामना करण्याचं सामर्थ्य आमच्या अंगी आहे. कारण त्याग, संयम, सेवा, समर्पण या सार्या चौकटीत राहुन आम्ही काम करत असतो. यशस्वी पुरूषांमागे स्त्री असं म्हणतात. पण, माझ्या राजकिय स्त्री जीवनात पुरूष खंबीरपणे पाठीमागे असल्याचे उदाहरण त्यांनी पतीच्या रूपात इथे दिले. कार्यक्रम समारोप प्रसंगी बोलताना डॉ.हेमंत वैद्य यांनी सांगितले की, संघ विचार संस्था पुढे घेवून जाताना सामाजिक दायित्व हेच संस्कार सनातन धर्मातून आमच्यावर झाले. जिथे महिलांचा सन्मान होतो, तो देश आणि राज्य ईश्वर स्वरूप नारी म्हणून ओळखल्या जाते. समाजात लोकांच्यासाठी काम करावं पण, त्याचा गाजावाजा किंवा दिखावा आम्ही करीत नसल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सौ.वेडे यांनी केले. याप्रसंगी नगराध्यक्षा तथा मान्यवरांच्या शुभ हस्ते महिलांना भेटवस्तू देवून सन्मानित करण्यात आले. उपस्थितांचे आभार प्रा.सौ.अंजली देशमुख यांनी मानले.

# शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर काँग्रेसची कळमनुरी-हिंगोली संघर्ष पदयात्रा

## प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची केंद्र व राज्य सरकारवर टिका



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मार्च**
शेतकऱ्यांसह इतर विविध प्रश्नांवर काँग्रेसने दि ९ मार्च रोजी कळमनुरी ते हिंगोली संघर्ष पदयात्रा काढली. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केंद्र व राज्य सरकारवर सडकून टिका केली.
राज्यात काँग्रेस पक्षाकडून महायुती सरकारविरोधात आंदोलन पुकारण्यात आले असून सोमवारी कळमनुरी ते हिंगोली दरम्यान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात ही पदयात्रा काढण्यात आली. यावेळी सपकाळ यांनी केंद्र व राज्य सरकारवर सडकून टिका केली. शासनाच्या शेतकरी, कष्टकरी तसेच जनतेच्या विरोधा-तील निर्णय तसेच शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी ही संघर्ष पदयात्रा काढण्यात आली होती. राज्यभरात हे आंदोलन काँग्रेकडून करण्यात येणार असून त्याचा शुभारंभ हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी येथून करण्यात आला आहे.
या पदयात्रेत काँग्रेसचे जिल्हा प्रभारी साहेबराव कांबळे, जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, प्रदेश उपाध्यक्ष ॲड सचिन नाईक, समन्वयक मोहन जोशी, ॲड सतीश पाचपूते, डॉ रमेश शिंदे यांच्यासह जिल्ह्यासह परजिल्ह्यातील काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने संघर्ष पदयात्रेमध्ये सहभागी झाले होते.
यावेळी अमेरिकसोबतचा व्यापारी करार, मनरेगा, आदिवासी वनहक्क कायद्याची अंमलबजावणी, घरकुल योजना व इतर प्रश्नांबाबत महामोर्चा काढण्यात आला.
यावेळी बोलतांना सपकाळ म्हणाले की, केंद्र सरकारने अमेरिकेशी करार केल्यापासून सर्वच शेतमालाचे भाव पडले आहेत. फळांच्या बाबतीतही शेतकऱ्यांना नुकसान सोस-ावे लागत आहे. केंद्र सरकार सर्व परिस्थिती हाताळण्यात अपयशी ठरले आहे. देशांतर्गत इंधानच्या दरवाढीबाबत बोलतांना ते म्हणाले की, क्रुड ऑईल स्वस्त होते तेव्हा त्याचा कोणताही लाभ भारतीय नागरिकांना दिला जात नाही परंतु तुटवड्याची परिस्थिती निर्माण झाली की, सरकार भांडवलदारांना अनुकूल असणारी दरवाढ करते. घरगुती गॅसची दरवाढ आता ६० रूपये इतकी झाली आहे. सरकार अशा आणीबाणीच्या परिस्थितीसाठी तयार नाही. कोणत्याही प्रकारचे नियोजन नाही. सरकारकडे कोणतेही आंतरराष्ट्रीय धोरण नसल्यामुळे भारताला अशा परिस्थितीला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. या पदयात्रेत शेतकरी, कामगार तसेच काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# हिंगोली जिल्हा भ्रष्टाचार मुक्त करा स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी

## पैशाचे झाड घेवून शेतकऱ्यांचा जिल्हाकेचरीवर मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मार्च**



सेनगाव पंचायत समितीच्या विहीर घोटाळा प्रकरणातील भ्रष्ट अधिकाऱ्यांवर तत्काळ कार्यवाही करावी तसेच जिल्ह्यात सुरू असलेल्या भ्रष्ट कारभाराचा निषेध करीत झाडाला नोटा बांधून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रतिकात्मक मोर्चा काढण्यात आला.
सेनगाव पंचायत समितीअंतर्गत विहीर घोटाळा नुकताच उघडकीस आला आहे. कागदोपत्री विहीर दाखवून पैसे उचलल्याचे उघडकीस आल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी दोन कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले आहे परंतु या प्रकरणाती तत्कालीन दोषी गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी, ग्रामसेवक तसेच अभियंता इतर अधिकारी यांच्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही. या अधिकाऱ्यांवर तत्काळ कार्यवाही करण्याची मागणी स्वाभिमानी संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.
सेनगाव पंचायत समितीसह जिल्ह्यातील सर्वच कार्यालयात घरकुल, विहीरी तसेच लाभाच्या योजनांसाठी लाभार्थ्यांना चकरा माराव्या लागत आहेत. पंचायत समितीमध्ये दलालामार्फत आर्थिक व्यवहार केल्याशिवाय कोणतेही काम होत नाही तर अधिकारी व कर्मचारी मनमानी कारभार करीत आ-हेत. याचेच उदाहरण म्हणजे नुकताच झालेला विहीर घोटाळा असून सेनगाव पंचायत समितीमध्ये कोणतेही काम पैसे घेतल्याशिवाय होत नाहीत तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने भ्रष्ट कारभार होत असल्याचा निषेच्ध करण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने हिंगोली येथील अग्रसेन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत एका झाडाला नोटा लावून निषेध मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये गजानन कावरखे यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# जवळा बाजार येथे महाराजस्व शिबीरात विविध प्रमाणपत्रांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मार्च**
औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिराचे जिल्हा परिषद हायस्कूल मैदानावर आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी विकास माने होते. यावेळी मान्यवरांच्याहस्ते विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.



या शिबिरास तहसीलदार हरीश गाडे, महसूल नायब तह-सीलदार प्रवीण ऋषी, विस्तार अधिकारी सय्यद जमीर, भूमी अभिलेख उपाभियंता सुभाष इंगोले, मंडळ अधिकारी प्रभाकर काळे होते.
प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. राज्याच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विविध लाभाच्या योजना लाभार्थ्यांना थेट देण्याकरिता जवळा बाजार येथील महाराजस्व अभियान शिबिरात तालुक्यातील शासनाची विविध कार्यालये सहभागी झाली होती. तसेच औंढा नागनाथ तालुक्यातील नवनिर्वाचित पोलीस पाटील यांना महाराजस्व अभियान शिबिरात नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. मंडळ अधिकारी रंगनाथ मेहत्रे, आशा गीते, अर्चना पटवे, लता बोडखे, श्रीकृष्ण दराडे, शेख हमीद, आदित्य आहेर, उषा चव्हाण, माधव भुसावळे, केशव जगताप, नरहरी मुंडे, गोपाल मुकीर, गजानन गुंजकर, दिनकर पौळ, संगमेश्वर सोनटक्के, ग्रामविकास अधिकारी गंगाधर हलबुर्गे नवनाथ गोडसे,नितीश कुलकर्णी, कल्याणी हटवार, विजय कदम, विनोद साळवे यांच्यासह तालुक्यातील मंडळ अधिकारी महसूल अधिकारी विस्तार अधिकारी ग्रामपंचायत अधिकारी, कृषी विभाग,आरोग्य विभाग,अंगणवाडीताई, आशावर्कर, लाभार्थी व नागरिकांची उपस्थिती होती.



**हिंगोली- भारतीय जनता पक्षाच्यावतीने रामराव वडकुते यांची राज्यसभेवर खासदार पदी बिनविरोध निवड झाल्यानंतर त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, रमेशचंद्र बगडीया, शिवाजीराव मुटकुळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### हिंगोलीत विराट राष्ट्रीय लोकमंचकडून खा. रामराव वडकुतेंचा सत्कार



हिंगोली- विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलच्यावतीने भाजपा नेते म रामरावजी वडकुते यांची राज्यसभा खासदार म्हणून बिनविरोध निवड झाल्या बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष शेख नईम शेख लाल, राष्ट्रीय संचालक शेख नौमान नवेद नईम, प्रमुख महासचिव शेख शाहनवाज हुसेन, शहर अध्यक्ष पठाण साजिद खान, शेख नफिस पहेलवान, पठाण कलीम खान, सय्यद गौस, खालिद पटेल, पठाण रौफ खान, शेख अदनान पहेलवान, जुबेर खान आदी अनेक पदाधिकारी व स्वयंमसेवक उप-स्थित होते.

### राष्ट्रवादीकडून खा रामराव वडकुतेंचा सत्कार



हिंगोली- भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष हिंगोली रामरा-वजी वडकुते यांची नुकतीच राज्यसभा खासदार पदी निवड झाल्याने त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जाहीर सत्कार कार्यक्रम सोमवारी नऊ मार्च रोजी दुपारी चार वाजता राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अनिल भाऊ पतंगे व माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्यावतीने व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने पुष्पहार घालून व पेढे भरून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य रवींद्र गडदे, बाबुराव वानखेडे, विकास शिंदे, उमेश देशमुख, हिंमत राठोड, संतोष आम्ले, माजी नगराध्यक्ष कैलास देशमुख, अशोकराव शिरामे यांच्यासह राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

### १३१ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १३१ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी दि ८ मार्च रोजी विविध ठिकाणी कारवाई करीत वाहनचालकांकडून १ लाख २९ हजार १५० रूपयांचा दंड वसूल केला आहे. तसेच अवैध दारू विक्री अंतर्गत दारूबंदी कायद्यांतर्गत एका ठिकाणी छापा मारून मुद्देमाल जप्त करीत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्रीमद् भागवत कथानिमित्त शहरातून भव्य शोभायात्रा व बांसापूजनाचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मार्च**



शहरात १९ मार्च गुरुवार पासून श्रीमद भागवत कथेचे आयोजन सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय कथाकार भाई श्री रमेश भाई आेझा यांच्या सुमधुर आवाजात करण्यात आले आहे.
कथेचे आयोजन स्थल शहरतील रामलीला येथे भव्य मंडप म्हणजेच पंडाल उभारनीची काम ८ मार्च पासून सुरु झाला. या साठी मंडपातील स्तंभ रोहन म्हणजेच बांसचे पूजन करण्याचा कार्यक्रम रविवारी दुपारी आयोजित करण्यात आला होते.
बांस पूजनासाठी हिंगोली शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. दुपारी ४ वाजता शहरातील पोस्ट ऑफिस रोडवरील श्री बद्रीनाथ मंदिरा-पासून ध्वज मिरवणूक निघाली. तत्पूर्वी श्री बद्रीनाथ मंदिरात ध्वजस्तंभाचे पूजन करण्यात आले. वैदिक मंत्रांचे पठण करत ध्वजस्तंभाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर झेंडा सह भव्य मिरवणूक निघाली. पारंपारिक वेशभूषा परिधान केलेले स्त्री-पुरुष बैंड बाजाच्या सोबत रांगेत मिरवणुकीत सामील झाले. ही मिरवणूक गांधी चौक, इंदिरा गांधी चौकातून मार्गस्थ होऊन रामलीला मैदानावर आली. जिथे ध्वजस्तंभ वैदिक मंत्रोपचारात फडकवण्यात आला. यावेळी काली माता मंदिर चे पुजारी खुशालचंद महाराज, खटकाली मंदिरचे पुजारी भगवानदास महाराज, बद्री नारायण मंदिर चे पुजारी विनय महाराज, नागराध्यक्षा रेखा श्रीराम बांगर उपस्थित होत्या. यावेळी खासदार राम राव वडकुते, आमदार तानाजी मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांनी मिरवणुकीत भेट दिल्या. मिरवणुकीत माजी नगराध्यक्ष जगजितराज खुराणा व प्रभुदास रायचंद परिवाराकडून फराळ व पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले. ही मिरवणूक शहरातील गांधी चौक, इंदिरा गांधी चौक मार्गे रामलीला मैदान येथे पोहोचली. जिथे वैदिक मंत्रोच्चारात स्तंभाची पूजा केली गैली. कथेच्या बांबू पूजनाच्या कार्यक्रमासाठी मिरवणुकीत महिला व पुरुष भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य संयोजक श्री गजराज बाल गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

# महिला दिनानिमित्त महिला कवी संमेलन रंगले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मार्च**
महिला दिनानिमित्त मराठवाडा साहित्य परिषद शाखा हिंगोली व थवा प्रकाशन, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च रोजी हिंगोली येथील जगदंब कॅफ येथे महिलांचे कवी संमेलन व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम दोन सत्रांत उत्साहात पार पडला.
कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात 'नोकरी करणाऱ्या स्त्रिया व त्यांच्या पुढील आव्हाने' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्योतीताई कोथळकर होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून प्राचार्या माधवीताई पाटील गोरेगावकर उपस्थित होत्या. दुसऱ्या सत्रात महिलांचे कवी संमेलन रंगले. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ हिंदी कवयित्री व गझलकारा सुमन दुबे 'स्वामिनी' होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून पारिजात देशमुख उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राधिका देशमुख, पारिजात देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन अश्विनी देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुमन दुबे डॉक्टर राधिका देशमुख, पारिजात देशमुख,आश्विनी देशमुख, विजया पतंगे,अंजली राजुरकर,अनुराधा राजुरकर,संगीता चौधरी, रसिका विडोळकर,ज्ञानदा चौधरी आदींनी प्रयत्न केले.

# हमाल-मापाडी यांना सुविधा द्या-दौलत खान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मार्च**
हमाल-मापाडी कामगार, गाडीवान, फडकरे व मुनीम यांचा अपघात विमा उतरविण्यात यावा, तसेच अपघात किंवा गंभीर आजाराच्या प्रसंगी उपचारासाठी बाजार समितीकडून तातडीची मदत म्हणून प्रत्येकी रूपये २० देण्यात यावेत या मागण्यांस इतर मागण्यांसाठी हमाल मापाडी संघटनेचे संचालक दौलत खान यांनी निवेदन सादर केले आहे.
निवेदनात माथाडी बोर्डाची अमलबजावणी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात तात्काळ करण्यात यावी, जेणेकरून कामगारांना कायदेशीर संरक्षण व हक्क मिळतील, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर बाजार आवारात शेतकरी व हमालांसाठी थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. मार्केट कमिटीमार्फत फिल्टर मशीन बसवून स्वच्छ व थंड पाणी उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.तसेच सार्वजनिक शौचालयांची नियमित स्वच्छता राखण्यासाठी एक कायम स्वरूपी कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात यावी, जेणेकरून स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने सुविधा सुधारतील. तसेच हळदीचा लिलाव कुपा पद्धतीने ऑनलाइन टेंडर प्रणालीद्वारे आठवड्यातून किमान तीन वेळा नियमितपणे सुरू ठेवण्यात यावा,

# कृषी विज्ञान केंद्र तोंडापूर व उगम ग्रामीण विकाससंस्थेत शेतकरी हितासाठी सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मार्च**



भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि संत नामदेव सेवाभावी संस्था, हिंगोली संचलित कृषि विज्ञान केंद्र, तोंडापुर तसेच उगम ग्रामीण विकास संस्था यांच्यात शेतकरी कल्याणासाठी नुकताच एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवण्यासाठी हा पुढाकार घेण्यात आला आहे.
याप्रसंगी संत नामदेव सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी खासदार ॲड. शिवाजीराव माने यांनी दोन्ही संस्थांच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले की, या करारामुळे शेतकरी हिताचे कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबवता येतील आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत सकारात्मक बदल घडवून आणण्यास मोठी मदत होईल.
कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. पी. पी. शेळके यांनी या कराराचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कराराचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना तांत्रिक प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि शेतीपूरक व्यवसायांना चालना देणे हा आहे.
या कार्यक्रमास आमदार बाबूराव कदम यांची विशेष उपस्थिती लाभली. उगम संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव यांनी विश्वास व्यक्त केला की, या भागीदारीमुळे शेतकरी बांधवांना आधुनिक शेती पद्धती, सुधारित बियाणे आणि शेती निगडीत नवनवीन व्यवसायांची माहिती अधिक सुलभतेने उपलब्ध होईल.
राजेश भालेराव (कृषि विद्या) अनिल ओळंबे (उद्यान विद्या) अजयकुमार सुगावे (पिक संरक्षण) सौ. रोहिणी शिंदे (गृह विज्ञान)डॉ. अतुल मो. मुराई (कृषि विस्तार) साईनाथ खरात (मृदा विज्ञान) डॉ. कैलास गीते (पशुविज्ञान)तसेच विजय ठाकरे, सौ. मनिषा मुंगल, ओमप्रकाश गुडेवार, गुलाबराव सूर्यवंशी, संतोष हाणवते आणि प्रेमदास जाधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल ओळंबे यांनी केले, तर आभार राजेश भालेराव यांनी मानले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जिल्हास्तरीय प्रदर्शनीत केशवराज विद्यालयाचे घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०९ मार्च :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लातूर यांनी अटल टिंकरिंग लॅब सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत जिल्हास्तरीय प्रदर्शनीचे आयोजन केले होते. यात यातील या विषयासाठी श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाचे चि. समर्थ अक्षय पोटे (९ वी ड ) व चि. नरसिंग तुकाराम नारायणपुरे (९ वी ड) या विद्यार्थ्यांना जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले असून त्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना अटल टिंकरिंग लॅबचे प्रमुख लक्ष्मीकांत बुगदे व शरद पांचाळ यांनी मार्गदर्शन केले होते. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, राम कुलकर्णी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## विविध वृत्त...

### जागेवरच निवड संधी या मोहिमे अंतर्गत रोजगाराची; आज प्लेसमेंट ड्राईव्ह

**लातूर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दीनदयाल उपाध्याय जागेवरच निवड संधी (प्लेसमेंट ड्राईव्ह)चे मंगळवार, १० मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजित करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात नामांकित आस्थापना, उद्योजक सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा, तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना सहभागी होता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी मंगळवार, १० मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालया समोर, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखती करीता आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वत:चा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इ. (तीन प्रती) सह उपस्थित रहावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

### कुस्ती मार्गदर्शक नियुक्तीसाठी २० मार्चपर्यंत अर्ज सादर करा

**लातूर :** भारत सरकारच्या क्रीडा विभागाने देशभरातील विविध जिल्ह्यांमध्ये खेळांच्या विकासासाठी विशेष प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यास मान्यता दिली आहे. या उपक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणारे दर्जेदार खेळाडू घडवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याच धोरणांतर्गत लातूर येथील खेलो इंडिया कुस्ती प्रशिक्षण केंद्राला मिळाली आहे. या केंद्रासाठी कुस्ती विषयाचे मानद तत्त्वावर मार्गदर्शक (कोच) नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. याकरिता २० मार्च २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मार्गदर्शक पदासाठी १८ ते ४५ वर्षे वयोगटातील ऑलिंपिक, आशियाई खेळ, जागतिक अजिंक्यपद, किंवा संबंधित खेळाच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग व पदक प्राप्त केलेले खेळाडू (प्रशिक्षण अनुभवासह), राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त प्रशिक्षक (प्रशिक्षण अनुभवासह), एन.आय.एस. (छखड) पदविका धारक किंवा संबंधित खेळाचे अधिकृत लेव्हल कोर्स पूर्ण केलेले, राष्ट्रीय स्पर्धा/राष्ट्रीय खेळांमध्ये पदक प्राप्त केलेले खेळाडू (प्रशिक्षण अनुभवासह), राज्यस्तरीय खेळाडू, बी.पी.एड./एम.पी.एड. पदवीधर, किमान दहा वर्षांचा कुस्ती प्रशिक्षणाचा अनुभव असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.पात्र उमेदवारांनी आपले शैक्षणिक प्रमाणपत्रे, खेळाचे प्रमाणपत्रे, प्रशिक्षण अनुभवाचे दाखले यांसह अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथे दिनांक २० मार्च २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

### रेनबो प्रि इंग्लिश स्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण संपन्न

**लातूर :** मोती नगर भागातील रेनबो इंग्लिश स्कूल चे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण कोरे गार्डन येथे संपन्न झाले कार्यक्रमाचे उद्घाटन माजी नगरसेविका सौ सुनीता चाळक यांच्या हस्ते सरस्वती दीप प्रज्वलन व प्रतिमापूजनाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था उपाध्यक्ष ज्ञानदेवराव तेलंगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नूतन नगरसेवक गणेश गवारे,नगरसेवक उद्धव तेलंगे, शिरुर अनंतपाळ पंचायत समिती सदस्य संजय सूर्यवंशी आदीची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी प्रास्ताविक संस्था अध्यक्ष प्रा. गिरीधर तेलंगे यांनी सादर केले. व्यासपीठावर यशवंत विद्यालयाचे सहशिक्षक विवेकानंद चिंचोले, नूतन प्राथमिक विद्यालयाचे सहशिक्षक संतोष केंद्रे,स्कूलच्या प्राचार्या सौ आश्विनी तेलंगे आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे सौ सुनीता चाळक,उद्धव तेलंगे, गणेश गवारे यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या,यामध्ये जवळपास ७६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण सोहळा चे सूत्रसंचालन सौ खुशी तिवारी आभार सौ मोहिनी धुमाळ यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैशाली सोमवंशी, सौ. अनिता चिंताले, आदींनी परिश्रम घेतले.

### प्रत्येक शनिवारी होणाऱ्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेवर शिक्षकांचा बहिष्कार

**लातूर :** निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत प्रत्येक शनिवारी आयोजित केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेसंदर्भातील पत्राच्या अनुषंगाने बहिष्कार टाकल्याची बाब शिक्षक व शिक्षकेत्तर संघटना समन्वय समितीने सीईओंना निवेदन देऊन स्पष्ट केली.निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत चालू शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत प्रत्येक शनिवारी शालेय कामकाजानंतर केंद्रस्तरीय शिक्षण परिषद आयोजित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. निपुण महाराष्ट्र अभियानचे उद्दिष्ट तसेच विद्यार्थ्यांची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान वृद्धिंगत करण्याचा हेतू शिक्षकांना मान्य आहे. शिक्षक त्या दृष्टीने प्रामाणिक कार्य करीत आहेत. प्रत्येक शनिवारी प्रत्यक्ष उपस्थित राहून परिषदेस येणे, ही बाब अडचणी निर्माण करणारी ठरत आहे.

## लातूर परिमंडळात फेब्रुवारी महिन्यात तब्बल २८ लाख ७७ हजारांचे 'चेक बाऊन्स'




### महावितरण करणार फौजदारी कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०९ मार्च :** थकीत वीजबिलाची वसुली टाळण्यासाठी किंवा वेळ मारून नेण्यासाठी जाणीवपूर्वक न वटणारे (बाऊन्स होणारे) धनादेश देणाऱ्या वीज ग्राहकांसाठी आता महावितरणने अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. लातूर परिमंडलात फेब्रुवारी महिन्यात तब्बल २८ लाख ७७ हजार ९१९ रुपयांचे ९८ धनादेश तांत्रिक किंवा आर्थिक कारणांमुळे अनादरीत (बाऊन्स) झाल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. या प्रकारामुळे वीज बिलांची वसूली रखडून थकबाकीचा डोंगर वाढत असल्याने, महावितरण प्रशासनाने आता अशा ग्राहकांविरुद्ध थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता केवळ प्रशासकीय दंडच नव्हे, तर कायद्याचा कडक कारवाईला वीजग्राहकांना सामोरे जावे लागणार आहे.

महावितरणने या गंभीर प्रकरणांची दखल घेत 'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स क्ट, १८८१ च्या कलम १३८ अन्वये कायदेशीर कारवाईची मालिका सुरू केली आहे. या कायद्यातील तरतुदीनुसार, कोणत्याही बँक खात्यातून जारी केलेला धनादेश अपुऱ्या निधीअभावी किंवा अन्य तांत्रिक कारणांमुळे न वटल्यास, महावितरणकडून संबंधित ग्राहकाला ३० दिवसांच्या आत रितसर नोटीस बजावण्यात येईल. या नोटीसची मुदत संपल्यानंतरही १५ दिवसांच्या आत जर संबंधित ग्राहकाने रकमेचा भरणा केला नाही, तर ३० दिवसांच्या आत त्या ग्राहकाविरोधात थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. या कायद्यानुसार दोषी ठरल्यास ग्राहकास दोन वर्षांपर्यंतचा कारावास किंवा धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट दंडाची, अथवा दोन्ही शिक्षा होण्याचे कायदेशीर प्रावधान आहे.

या कठोर कायदेशीर प्रक्रियेसोबतच महावितरणने आपल्या अंतर्गत नियमावलीतही कडक बदल केले आहेत. ज्या ग्राहकांचे धनादेश बाऊन्स होतील, त्यांची पुढील सहा महिन्यांसाठी धनादेशाद्वारे वीजबिल भरण्याची सुविधा पूर्णपणे निलंबित केली जाणार आहे. याशिवाय, प्रत्येक वीज बिलासाठी विलंब शुल्क आणि जीएसटीसह ८८५ रुपयांचा दंड थेट पुढील बिलात 'इतर आकार' या सदराखाली समाविष्ट केला जाणार आहे. विशेष बाब म्हणजे, जर एकाच धनादेशाद्वारे अनेक बिलांची रक्कम भरली गेली असेल, तर प्रत्येक बिलासाठी स्वतंत्र दंडाची आकारणी केली जाणार आहे, ज्याचा मोठा आर्थिक भुर्दंड ग्राहकांना सोसावा लागू शकतो.

सद्यस्थितीत अनेक ग्राहकांकडून चुकीची तारीख टाकणे, स्वाक्षरीमध्ये तफावत असणे, खाडाखोड करणे किंवा बँक खात्यात पुरेशी रक्कम नसतानाही धनादेश देणे असे प्रकार सर्रास घडत आहेत. या सर्व त्रुटी आता महावितरणच्या रडारवर आल्या आहेत. महावितरणने सर्व वीज ग्राहकांना आवाहन केले आहे की, धनादेश देताना तारीख, अचूक रक्कम, स्पष्ट स्वाक्षरी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे बँक खात्यात पुरेशी शिल्लक असल्याची ग्राहकांनी पूर्ण खात्री करावी. महावितरणच्या या कठोर धोरणामुळे आता केवळ थकीत वसुलीच वेळेवर होणार नाही, तर वीज ग्राहकांमध्ये आर्थिक शिस्तही पाळली जाईल. त्यामुळे आता वीज ग्राहकांनी अधिक सावध राहणे आणि बिलाचा भरणा वेळेवर व अचूक पद्धतीने करणे, हेच त्यांच्या हिताचे ठरणार आहे. लातूर परिमंडळाअंतर्गत लातूर , बीड व धाराशी असे तीन जिल्हे येतात. जिल्हानिहाय हे प्रमाण बीड ३८ धनादेश ११ लाख ६२ हजार १३० रुपये, धाराशिव १७ धनादेश ३ लाख ३८ हजार ८८९ व लातूर ४३ धनादेश १३ लाख ७६ हजार ९०० रुपये असे आहे.

## जागृती शुगर कारखान्याची वजन काटे भरारी पथकाकडून तपासणी

### शासनाकडून अचूक काटे असल्याचे प्रमाणपत्र



**तभा वृत्तसेवा**

***लातूर, दि. ०९ मार्च :*** *राज्यातील खाजगी साखर कारखानदारीत एफ. आर.पी पेक्षा अधिक भाव ऊस पुरवठा शेतकऱ्यांना देणाऱ्या देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईंड इंडस्ट्रीजला साईटवर वजन काटे यांची शासकीय अधिकारी यांच्यासह शेतकरी प्रतिनिधींनी संयुक्त पथकाद्वारे पाहणी केली तपासणी केल्यानंतर कारखान्यावर काटा योग्य व अचूक असल्याचा निष्कर्ष समितीने दिला आहे त्यामुळे जागृति शुगर ला अचूक काटे असल्याचे प्रशस्तीपत्र बहाल करण्यात आले आहे.*

*भरारी पथकाची अचानक भेट व तपासणी*

*सध्या जिल्ह्यातील सर्वच साखर कारखान्याकडे वजन काटे तपासणीसाठी भरारी पथकाची नियुक्ती केल्याने आज शुक्रवारी अचानक वजन करून व गव्हाणीकडेगे लेल्या वाहनांना परत बोलवून काट्याची तपासणी केली भरलेली व रिकामे केलेली वजन घेण्यात आले ते अचून असल्याचे त्यांनी सांगितले त्यानुसार जागृती शुगर म्हणजे प्रगती या ब्रीदवाक्य प्रमाणे उस उत्पादक शेतकऱ्यांचा विकास, विश्वास या साखर कारखान्याने आपले वेगळेपण जपले आहे ते पुन्हा अधोरेखित झाले आहे राज्याचे माजी मंत्री जागृति शुगरचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय दिलीपरावजी देशमुख साहेब, जागृति शुगर च्या अध्यक्षा तथा कार्यकारी संचालक आदरणीय सौ गौरवी ताई अतुलबाबा भोसले देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे यांच्या सूचनेनुसार कारखाना व्यवस्थापन नियोजन पारदर्शकता ठेवून कार्य करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे.*

*भरारी पथकात देवणीचे तहसीलदार सोमनाथ वाडकर वैद्यमापनशास्त्र निरीक्षक कांबळे एम आर, लेखा परीक्षक श्रेणी २ आर बी पवार, पोलीस उपनिरीक्षक एस जी कोंडामंगले, कारखान्याचे सरव्यवस्थापक गणेश येवले, उपअभियंता अक्षय सूर्यवंशी ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिराजदार प्रगतशील ऊस उत्पादक शेतकरी धनाजी जाधव, ऊस उत्पादक शेतकरी विष्णू निडवंचे, विजेंद्र कोटे राहणार तळेगाव, सहाय्यक केनयार्ड सुपर वायझर महेश काळे आदी उपस्तीत होते.*

## अटल टिंकरींग लॅब असलेल्या २२ शाळांतील १७० विद्यार्थ्यांचे ८८ प्रकल्प सादर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०९ मार्च :** राज्य शैक्षणिक संशाधन व प्रशिक्षण परिषद पुणे, महाराष्ट्र, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड, दयानंद कला महाविद्यालय, लातूर व रोटरी क्लब, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अटल विद्यार्थी व शिक्षक जिल्हास्तरीय प्रकल्प २०२५-२६ चे प्रदर्शनाचे आयोजन दयानंद कला महाविद्यालयात करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मारुती सलगर होते, या प्रदर्शनाचे उद्घाटन सहाय्यक शिक्षण संचालक संजय पंचगल्ले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, रोटरी अध्यक्ष श्री जकी खान कायमखानी यांची उपस्थिती होती. यावेळी पंचगल्ले म्हणाले, विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारावा, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नवनिर्मिती करावी, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, रोटरी अध्यक्ष जकी खान कायमखानी यांचे मनोगत झाले.

## रोटरी क्लब लातूर सेंट्रलच्या वतीने कारागृहातील महिलांना साड्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०९ मार्च :** रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त रविवारी येथील जिल्हा कारागृहात बंदी असलेल्या महिलांसाठी साडी वाटप व मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.



यावेळी मार्गदर्शक म्हणून डॉ. उमा देशपांडे यांची उपस्थिती होती. यावेळी रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, हेमंत रामढवे , सुदर्शन कांबळे, प्रकाश राठोड, सौ. सुनंदा जगताप, लातूर जिल्हा कारागृहाचे अधीक्षक मुलाणी , उपअधीक्षक लटपटे, सुभेदार मुंडे आदी मान्यवरांची उपस्थित होते. कारागृहातील महिला बंदींना साड्यांचे वाटप केले गेले.

यावेळी त्यांना मार्गदर्शन करताना डॉ. उमा देशपांडे महिलांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोन ठेवत आत्मविश्र्वासाने नव्याने उभे राहण्याचा संदेश दिला. जीवनात प्रत्येकाला अडचणींचा सामना करावाच लागत असतो. त्यावर मात करत जीवनाची वाटचाल चालू ठेवणे आवश्यक असते. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी संयमाने त्यावर मार्ग, योग्य तोडगा काढणे शक्य होते. कोणत्याही अडचणींवर मार्ग काढण्यासाठी उचित व्यक्तींच्या सल्ल्याचीही गरज असते. त्यादृष्टीने वागण्याचा, चालण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे, असेही डॉ. देशपांडे म्हणाल्या. रोटरी क्लबचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे यांनी आपले विचार व्यक्त करताना आयुष्यातील अडचणींवर मात करून नव्या उमेदीनं पुढे जाण्याचा संदेश दिला. जीवनाच्या खडतर प्रवासात खाचखळगे येतच असतात. त्यावर प्रसंगानुरूप मात करून ते अडथळे दूर करण्याचा प्रयत्न पावलोपावली केला पाहिजे,असेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने कारागृहातील अधिकारी व महिला कर्मचारी यांचाही सन्मान करण्यात आला.

## विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत यांच्या तर्फे आज रामेश्वर येथे राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड स्मृती महावीर कुस्ती स्पर्धा ; अनेक मान्यवरांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०९ मार्च :** विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक-दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी होणार आहे. स्पर्धेतील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा, मेडल व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी कुस्ती खेळाडूसह क्रीडा प्रेमींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे.





माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल वि. कराड यांच्या मार्गदर्शनात ही स्पर्धा संपन्न होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. तसेच, पारितोषिक वितरण समारंभ याच दिवशी सायं. ७ वा. होणार आहे. समारंभास ट्रिपल महाराष्ट्र केसरी आणि अर्जुन अवॉर्डी पै. नरसिंग यादव प्रमुख पाहुणे तसेच, हिंद केसरी पै. जगदीश कालीरमण हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग, महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, महाराष्ट्र केसरी आणि महाराष्ट्र श्री पै. विजय उर्फ विकी बनकर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. रामेश्वर (रुई) चे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड हे प्रमुख मार्गदर्शक आहेत. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली ही स्पर्धा होणार आहे.

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे हे १९ वे वर्ष आहे. यासाठी महाराष्ट्रातील नामवंतासह देशभरातील मल्लांना निमंत्रीत केले आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेतील महावीर केसरी गटातील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी हा अत्यंत बहुमानाचा किताब, रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकास रोख रूपये १,००,०००/- , तृतीय क्रमांक ५० हजार आणि चतुर्थ क्रमांकास २५ हजार रूपये यासह वजन गट ५७, ६१, ६५, ७०, ७४, ८६ आणि ८६ प्लस ते १२५ किलो वजन गटातील विजेत्या मल्लांना गटनिहाय हजारो रूपयांची पारितोषिके, सुवर्ण, रौप्य, कास्यं पदक, मेडल, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, उपांत्यपूर्व फेरीमध्ये पोहोचलेल्या सर्व कुस्तीगीरांना मानधन देण्यात येईल. थोर स्वातंत्र्य सेनानी, राष्ट्रीय कीर्तनकार, योग महर्षि शतायुषी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ तंदुरूस्त अशा पंच्चाहत्तर वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी एक आगळी वेगळी कुस्तीस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. विजेत्यांना स्मृती सुवर्ण, रौप्य, कांस्य गौरव पदक बहाल करण्यात येईल.

या स्पर्धेत जास्तीत जास्त मल्लांनी सहभागी व्हावे. त्याच बरोबर कुस्ती स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमींनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड, महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा संयोजन समितीचे सचिव प्रा. विलास कथुरे, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, डॉ. महेश थोरवे आणि क्रीडा विभागाचे संचालक डॉ. वैभव वाघ यांच्यासह संयोजन समितीने केले आहे.

# मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारी 'मिसिंग रेल्वे लिंक' पूर्ण करा!

## खा. अशोक चव्हाणांची केंद्राकडे आग्रही मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ मार्च-**

नांदेड-लातूर थेट रेल्वे मार्गाचा प्रस्ताव केवळ दोन जिल्ह्यांना जोडणारा प्रकल्प नसून, ही विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या तिन्ही विभागांना रेल्वे मार्गे जवळच्या अंतराने जोडणारी एक महत्त्वाची 'मिसिंग लिंक' असल्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे. या प्रकल्पाला केंद्र सरकारने मंजुरी देण्याची मागणी आज राज्यसभेत मांडताना ते बोलत होते.

शून्य प्रहरात काळात हा मुद्दा उपस्थित करताना ते म्हणाले की, नांदेड आणि लातूर ही मराठवाड्यातील कृषी व व्यापाराची मोठी केंद्रे आहेत. मात्र, या दोन शहरांत अद्याप थेट रेल्वे मार्ग नाही. सध्या रेल्वेने २१२ किमीचा वळसा घालून जाण्यासाठी ६ तास लागतात, तर रस्ते मार्ग १४४ किमीचा आहे. प्रस्तावित १०४ किमीच्या नवीन थेट रेल्वे मार्गामुळे हा प्रवास अवघ्या सव्वा तासात पूर्ण होणे शक्य आहे.

या प्रकल्पाचे व्यापक महत्त्व स्पष्ट करताना खा. अशोकराव चव्हाण यांनी तांत्रिक आकडेवारी सादर केली. ते म्हणाले की, ही मिसिंग लिंक पूर्ण झाल्यास विदर्भातील नागपूर आणि पश्चिम महाराष्ट्रात मिरज या दोन मोठ्या रेल्वे जंक्शनमधील अंतर ९९१ किमीवरून ८०७ किमीवर येईल. म्हणजेच सुमारे १८४ किमीचे अंतर कमी होईल. याचा थेट फायदा विदर्भ आणि शेजारील छत्तीसगड, मध्यप्रदेशातील बिलासपूर व जबलपूर सारख्या शहरांना पश्चिम किनारपट्टीकडे जाण्यासाठी होईल.



महाराष्ट्र सरकारने या प्रकल्पाच्या खर्चात आपला ५० टक्के वाटा उचलण्याचे आधीच मान्य केले आहे. या प्रकल्पाचा 'फायनल लोकेशन सर्व्हे' देखील पूर्ण झाला असून प्रस्ताव रेल्वे मंत्रालयाकडे प्रलंबित आहे. केंद्र सरकारने याला तातडीने मंजुरी दिल्यास राज्याच्या आर्थिक विकासाला मोठी गती मिळेल, असे ते पुढे म्हणाले.

# शिवजन्मोत्सवात व्यसनमुक्तीचा युवकांचा निर्धार

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ९ मार्च-**

निवघा येथे शिवजन्मोत्सवानिमित्त ग्रामस्थांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास सामूहिक दुग्ध व जलाभिषेक करण्यात आला आहे. निवघा गावातील युवकांनी शिवजन्मोत्सवानिमित्त व्यसनमुक्तीचा निर्धार केला असून आदर्श जीवन मार्गावर चालण्याचा सामूहिक निर्णय घेतला आहे.

तालुक्यातील निवघा नगरीत सर्वधर्मीय शिवजन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्त गावातील प्रमुख रस्त्यावरून पालखी मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात करण्यात आली. यावेळी ठिकठिकाणी आकर्षक रांगोळी काढून पुष्पवृष्टी करण्यात आली. शिवस्मारकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेविका मीनल पाटील , कामाजी पवार निवघेकर , कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निलेश देशमुख बारडकर, माजी सभापती लक्ष्मणराव जाधव, बालाजी सुर्यतळे,माजी सरपंच दिलीपराव कोरे, शिवजयंतीच्या आयोजक शिवश्री योगेश पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने नवनिर्वाचित



नगरसेविका मीनल पाटील यांचा खोबऱ्याची गाठी घालून स्वागत केले.

शिवजन्मोत्सवानिमित्त सप्त खंजीर वादक सत्यपाल महाराज यांचे शिष्य गंगाधर गरुड यांच्या समाज प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गंगाधर गरुड यांनी ग्रामस्थांना व्यसनापासून दूर राहण्याचा , अंधश्रद्धा समाजातून नष्ट करण्याचा, आई-वडिलांची सेवा, विद्यार्थ्यांनी शिक्षणात भरारी घेण्याचा संदेश देऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श विचार आचरण करण्याचे सामूहिक शपथ यावेळी देण्यात आली. गावातील युवकांनी व्यसनमुक्तीचा निर्धार करून सर्वधर्मसमभाव बंधुत्व एकोप्याने राहण्याचे सामूहिक शपथ घेतली. यावेळी सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, शिवस्मारक समिती अध्यक्ष, शिवजयंती आयोजक यांच्यासह गावातील सर्व जाती धर्मातील युवक , वृद्ध, महिला, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता.

## दत्तकृपा टी स्टॉल येथे महिला दिन

**माहूर** -सनदी अधिकारी प्रशांत भाऊ राठोड यांच्या पुढाकारातून उभारलेल्या श्री दत्तकृपा टी स्टॉल येथे जगभरासह भारत देशातील थोर महिलांसह स्वर्गीय पीपळीबाई पूरसिंग राठोड यांना अभिवादन करून दि. ०८ रोजी महिला दिन आनंदात साजरा करण्यात आला.



माहूर तहसील कार्यालयाच्या गेट समोर सनदी अधिकारी प्रशांत भाऊ राठोड यांच्या पुढाकारातून स्व.पिपळीबाई पूरसिंग राठोड यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या विजय कांबळे यांच्या श्रीदत्त कृपा टी-स्टॉल येथे वर्षभर मान्यवरांसह थोरा मोठ्यांची जयंती, पुण्यतिथी साजरी होत असते. तसेच मान्यवरांचे वाढदिवसही साजरी केले जातात. त्यानिमित्त जगभरातील थोर कर्तबगार महिलांच्या सन्मानार्थ प्रशांत भाऊ राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली महिला दिन साजरा करण्यात आला. श्री दत्तकृपा स्टॉलचे संचालक विजय कांबळे यांनी पुढाकार घेऊन महिला दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होत. या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या तथा महिला पत्रकार सौ.पद्माताई गिऱ्हे यांच्या हस्ते थोर महिलांच्या प्रतिमांचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. यावेळी वंदना राठोड अंगणवाडी शिक्षिका शिलाताई कांबळे अंगणवाडी मदतनीस माजी शिक्षिका सरस्वतीबाई गरुडे, प्रेमिलाताई गरुडे कर्मचारी बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय चैताली राठोड,आरती मोहिते, अनुसया हजारी ,मंदाबाई गेडाम यांच्यासह अनेक महिलांची उपस्थिती होती.

## थोटवाडी येथे अखंड शिवनाम सप्ताह निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

**बाऱ्हाळी**-थोटवाडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी परिसरातील भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन थोटवाडी येथील गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे. थोटवाडी ता. मुखेड येथे वसुंधरारत्न राष्ट्रसंत लिं. डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या कृपाशीर्वादाने व १०८ डॉ. शंभूलिंग शिवाचार्य महाराज उदगीर, १०८ शिवकुमार शिवाचार्य महाराज स्वांत नागराळ यांच्या प्रेरणेने गुरुवार दि. ५ मार्च ते १२ मार्च दरम्यान अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरस्य पारायण सोहळ्यानिमित्त शिवपाठ, परमरस्य पारायण, गाथा भजन, पोथी वाचन, शिवपाठ, शिवकिर्तन, शिव जागरण आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहामध्ये शि.भ.प. सौ. स्वातीताई दापकेकर, शि.भ.प. लक्ष्मण चवळे महाराज शेलदरकर, शि.भ.प. विकास महाराज धसवाडी, अमोल महाराज बनवस, शि.भ.प. संगमेश्वर महाराज बिरादार, शि.भ.प. शिवानंद हैबतपुरे उदगीर, शि.भ.प. भगवंतराव पाटील चांभरगेकर यांचे रात्रीचे कीर्तन तर शि.भ.प. कोमलताई संपत्ती हात्ती यांचे टाळ आरतीचे तसेच शि.भ.प.श्री १०८ दिगंबर शिवाचार्य महाराज वसमत यांचे प्रसादाचे कीर्तन होणार आहे. यावेळी पारायण प्रमुख सुर्यकांत पाटील, मारोती पाटील, मल्लिकार्जुन पाटील, शंकर पाटील, साकेत पाटील, वादक म्हणून तुकाराम पांचाळ चांडोळा, पुंडा कामजे, लक्ष्मण गोंदलवाड, माधव भूत्तापल्ले, गायक म्हणून बाबू पाटील चांडोळ, भास्कर उपस्थित राहणार आहेत. तरी परिसरातील भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन थोटवाडी येथील गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## गुरुद्वारा प्रभाग क्र. १७ मधील नाल्याची साफसफाई करण्याची मागणी

**नांदेड** -गुरुद्वारा प्रभाग क्र. १७ मधून वाहणाऱ्या मोठ्या नाल्यात सध्या मोठ्या प्रमाणात कचरा, गाळ, विटा व धोंडे साचल्यामुळे नाल्याचा प्रवाह अनेक ठिकाणी बंद झाला असून परिसरात अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून नाल्याची तात्काळ साफसफाई करून दर महिन्याला नियमित साफसफाई करण्यात यावी, अशी मागणी अमर सेवा आश्रमचे अध्यक्ष अमरजीतसिंघ पंजाबसिंघ गिल यांनी केली आहे. याबाबत त्यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त, महापौर व उपमहापौर यांना निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सदर नाल्याची शेवटची साफसफाई जून-जुलै २०२५ मध्ये महानगरपालिकेच्या आदेशानुसार करण्यात आली होती. मात्र त्यानंतर जवळपास सात ते आठ महिन्यांपासून नाल्याची साफसफाई झालेली नाही.ही जबाबदारी नवनिर्वाचित नगरसेवकाची असून ते पण दुर्लक्ष करीत आहेत. सदर नाला अबचलनगर, बडपुरा, शहीदपुरा, मुरमुरा भट्टी, बालाजी मंदिर व रामघाट मार्गे वाहत जाऊन गोदावरी नदीत मिळतो. नाल्यामध्ये मोठ्या प्रमाणात कचरा व गाळ साचल्यामुळे ठिकठिकाणी घाण पाणी साचत असून डासांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मलेरिया व डेंग्यू सारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाच्या विशेष पथकाद्वारे प्रत्यक्ष पाहणी करून नाल्याची तात्काळ साफसफाई करण्यात यावी तसेच भविष्यात दर महिन्याला नियमित साफसफाईची व्यवस्था करण्यात यावी, अशी विनंती अमर सेवा आश्रमच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती महानगरपालिकेचे उपायुक्त (स्वच्छता विभाग) तसेच सहाय्यक आयुक्त, क्षेत्रीय कार्यालय क्र. ४ यांनाही देण्यात आल्या आहेत.

## राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**नांदेड** -नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेड येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQC) वतीने राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. एस. बी. फड होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राची दुरावस्था

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ९ मार्च-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र' हे विद्यापीठातील पहिले अध्यासन केंद्र म्हणून ओळखले जात असून लोकसहभागातून उभे राहिलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र हे प्रशासन, संबंधित समन्वयक व लिपीक यांच्यात समन्वय नसल्यामुळे सदरील केंद्राच्या दुरावस्थेचे कारण बनल्यामुळे या केंद्रास साहित्याची जाण असणारे अधिकारी व संगणकाचे ज्ञान असणारा कर्मचारी देण्यात यावा तरच येथील अधिकारी व कर्मचारी यांच्यातील समन्वयाने केंद्रास पुन्हा उभारी मिळेल.




स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र' येथे यापूर्वी या केंद्राचे समन्वयक व लिपिक आणि कर्मचारी यांच्यात मोठा समन्वय असायचा म्हणून येते वैचारिक पातळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विचारांचे संशोधन करणे तसेच ते व्यापक समाजापर्यंत पोहोचवणे हा या केंद्राचा मुख्य उद्देश आहे. विविध व्याख्याने, चर्चासत्रे आणि कार्यशाळांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर प्रबोधन घडवून आणणे, विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करणे तसेच संशोधनासाठी पोषक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे या उद्देशाने अनेक उपक्रम येथे राबवने. गरजेचे आहे. सध्या या अभ्यास केंद्राचे समन्वय व लिपिक यांच्यात समन्वय नसल्यामुळे येथील कारभार कळमला गेल्याचे दिसून येते. समन्वयक एक उत्कृष्ट साहित्यिक नसल्याचे बोलले जाते तर याच विभागाचे लिपीक यांना संगणकाचे पुरेपूर ज्ञान नसल्याने. समन्वयक आणि लिपीक यांच्या खटके उडत असल्याचे दिसून येते. लिपिकांना संगणकाचे ज्ञान नाही तर समन्वयकांना प्रमुख साहित्यिक, सामाजिक, राजकीय वक्तव्य करणाऱ्या वक्त्यांची जाण नसल्यामुळे या अध्यासन केंद्रात विविध व्याख्याने, चर्चासत्रे आणि कार्यशाळांच्या माध्यमातून कार्यक्रम व कार्यशाळा होत नसल्यामुळें सदरी अध्यासन केंद्र सध्यातरी मोडकळीस आल्याचे चित्र दिसून येत आहे. तेव्हा येथील प्रशासनाने या बाबींचा विचार करून या दोन्हीही कर्मचाऱ्यांना बाजूला सारून सदरील अभ्यास केंद्र उपयुक्त व विचारधारेच्या प्रवाहात नेहमी तत्पर असणारे अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी करावी अशी चर्चा विद्यापीठ परिसरात चालू आहे.

# कैलासमोक्ष स्मशानभूमीची संरक्षक भिंत दुरुस्तीची मागणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ९ मार्च-**

शहरातील मार्कंडेय मंदिर परिसरामागील कैलासमोक्ष स्मशानभूमीची कंपाऊंड भिंत काही दिवसांपासून पडलेल्या अवस्थेत असून यामुळे परिसर पूर्णपणे उघडा पडला आहे. परिणामी येथे जनावरे तसेच इतर व्यक्तींची वर्दळ वाढल्याचे दिसून येत आहे.

स्मशानभूमी ही अत्यंत पवित्र व संवेदनशील जागा असल्याने येथे सुरक्षितता आणि स्वच्छता राखणे गरजेचे असते. मात्र कंपाऊंड भिंत पडल्यामुळे परिसर असुरक्षित झाला असून स्वच्छतेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत चिंता व्यक्त केली आहे. या स्मशानभूमीत शहरातील नागरिकांचे अंत्यसंस्कार होत असल्याने परिसराची योग्य देखभाल होणे आवश्यक आहे. पडलेली भिंत तातडीने दुरुस्त करून परिसर सुरक्षित करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, या समस्येकडे किनवट नगरपरिषद प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन कंपाऊंड भिंतीची दुरुस्ती लवकरात लवकर करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# देगलूर नगर परिषदेत महिला दिन ; सॅनिटरी पॅड, तुळशीचे रोप आणि संविधान उद्देशिका देऊन महिलांचा सन्मान

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ९ मार्च-**

जागतिक महिला दिनानिमित्त देगलूर नगर परिषदेत महिलांच्या सन्मानार्थ विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महिलांना सॅनिटरी पॅड, तुळशीचे रोप आणि भारतीय संविधानाची उद्देशिका देऊन गौरविण्यात आले. आरोग्य, संस्कार आणि कायद्याचे ज्ञान वृद्धिंगत करणारा हा उपक्रम महिलांसाठी प्रेरणादायी ठरला.

या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यमान नगराध्यक्षा सौ. विजयमाला बालाजी टेकाळे ह्या होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अश्विनी देशपांडे, देगलूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक किरण बेंबडे आणि समतादूत ॲड. दिपाली हाडोळे उपस्थित होते.

यावेळी डॉ. अश्विनी देशपांडे यांनी महिलांच्या आरोग्यविषयक समस्या आणि सॅनिटरी पॅड वापरण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. पोलीस उपनिरीक्षक किरण बेंबडे यांनी महिला सुरक्षा व कायदे यावर माहिती दिली, तर समतादूत ॲड. दीपाली हडोळे यांनी महिलांचे कायदेशीर हक्क याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.



याप्रसंगी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निलम कांबळे यांनी महिलांना संबोधित करताना कचरा व्यवस्थापन व स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. महिलांचे समाज आणि देशाच्या विकासात मोठे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा नगराध्यक्षा विजयमाला टेकाळे यांनी महिलांचे संस्कार, कुटुंब आणि समाजसेवेतले योगदान अधोरेखित केले.

यावेळी उपनगराध्यक्ष यांची सौभाग्यवती अंजलीताई ॲड अंकुश देसाई, राष्ट्रवादी पक्षाचे गटनेत्या नगरसेविका उज्वला लक्ष्मीकांत पदमवार, नगरसेविका योगेश्वरी तोटावार, नगरसेविका मिनाक्षी कांबळे, नगरसेविका स्नेहा कांबळे, नगरसेविका रोहिणी मैलागिरे, नगरसेविका शोभा कडलवार, नगरसेविका पल्लवी द्याडे, नगरसेविका शेख आर्शिया फातिमा पाशा, रत्नमाला कौरवार यांच्यासह भार्गवी दिक्षित, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या सौभाग्यवती गोसावी मॅडम, उपमुख्याधिकारी स्वाती वाकोडे, विजया तेलगू, नागमणी उतारे, ज्योती वाघमारे, शबाना, सुनीधी, कल्पना पिंगळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सेवानिवृत्त लेखापाल व नगरसेविका विनायक कांबळे यांच्या नात साक्षी सुमित कांबळे तसेच मुख्याधिकारी निलम कांबळे यांचे चिरंजीव सृजन खतगावकर आणि संचित खतगावकर यांनी महिला दिनानिमित्त मनोगत व्यक्त करून उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. यावेळी लालू सोनकांबळे, स्वच्छता निरीक्षक गौरव जाधव व रत्नदिप सुर्यवंशी यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी, महिला व नागरिक उपस्थित होते.

यावेळी महिलांसाठी विविध खेळ आणि उपक्रम आयोजित करण्यात आल्याने कार्यक्रमात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या महिलांच्या आरोग्य, संस्कार आणि कायदेशीर जागृतीसाठी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम उपस्थितांकडून मोठ्या प्रमाणावर कौतुकास पात्र ठरला.

# वसंतनगर नांदेड येथील रस्त्याचा कामाचा आमदार चिखलीकर यांच्या हस्ते शुभारंभ



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ मार्च-**

वसंतनगर येथील प्रभाग ०९ मधील वसंतनगर नांदेड येथील वत्सल सुपर मार्केट ते पी. डी. जाधव यांच्या घरा पर्यन्त सिमेन्ट रस्ता करणे रु.८५.०० लक्ष कामाचे दिनांक ०८ मार्च रोजी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले असुन यावेळी सौ. प्रणिताताई देवरे - चिखलीकर भाजपा प्रदेश उपाध्यक्षा महिला मोर्चा, प्रविण पाटील चिखलीकर प्रदेश सरचिटणी राष्ट्रवादी कॉंग्रेस, माधव पावडे कार्याध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस, आर.डी. कवळे, कैलास देशमुख गोरठेकर, पी.डी. जाधव, देवराव कंकाळ, गंगाधर साधू, बी. आर. कदम, प्रविण कदम, विशाल कदम, शिवाजीराव हुसेकर, प्रविण साधू, प्रकाश राशतवार, शंकरराव वट्टमवार, संदिप चिटमलवार, बालाजी उत्तरवार, संजय वांगीकर, योगेश वट्टमवार, प्रविण दमाम, डॉ.गणेश मनुकर, डॉ. स्वप्नील आढाव, डॉ. संकेत आढाव, राहूल पाटील, बालासाहेब देशमुख पार्डीकर, नागेश कंकाळ, इरबाजी कदम, दिपक भडके, दिलीप टाकळीकर, नाईक, सोनसळे, तुकाराम पाटील, आदी उपस्थित होते.

# किड्स किंगडम पब्लिक स्कूलची मान्यता रद्द तर चैतन्य टेक्नोवर कायदेशीर कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ मार्च-**

किड्स किंगडम पब्लिक स्कूल या मान्यताप्राप्त शाळेने चुकीच्या पध्दतीने चैतन्य टेक्नो स्कूल या अनाधिकृत शाळेचे नाव वापरुन विद्यार्थी व पालकांची दिशाभूल केल्याची निष्पन्न झाल्यानंतर नुकतेच दि.५ मार्च रोजी काढलेल्या एका पत्रानुसार किड्स किंगडम पब्लिक स्कूल या शाळेची शैक्षणिक सत्र २०२५-२६ पासून मान्यता काढण्याचे आदेश जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी गटशिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत.

खुरगाव येथील किड्स किंगडम पब्लिक स्कूलने चैतन्य टेक्नो या अनाधिकृत शाळेचे नाव वापरुन पालकांची दिशाभूल केल्याप्रकरणी ॲड.प्रमोद नरवाडे यांनी तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने शाळेची मान्यता काढल्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे दि.२३ डिसेंबर रोजी सादर केला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयामध्ये सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत किड्स किंगडम या शाळेस शासन मान्यता आहे परंतु या शाळेने श्री चैतन्य टेक्नो स्कूलचे नाव वापरुन पालक व विद्यार्थ्यांकडून शुल्क वसुल केले. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये यासाठी शैक्षणिक सत्र २०२५-२६ अखेर शाळेची मान्यता काढण्यात येत असून, चैतन्य टेक्नो स्कूल या शाळेने शासनाची मान्यता नसताना शाळेच्या नावाचा फलक लावून विद्यार्थी व पालकांकडून अनाधिकृतपणे प्रवेश शुल्क वसुल केल्याने या शाळेवर कायदेशीर कारवाई करावी, असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये यासाठी शाळेतील सर्व विद्यार्थी तसेच अभिलेखाचे समायोजन करावे, असेही आदेश जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्याने दिले आहेत. दरम्यान किड्स किंगडम पब्लिक स्कूल या शाळेची मान्यता काढण्यात येत असल्याने विद्यार्थी व पालकांनी या शाळेत प्रवेश घेवू नये, असे आवाहन ॲड.प्रमोद नरवाडे यांनी केले आहे.

# संस्कार आणि संस्कृती स्त्रियांमुळेच टिकून आहे : राम तरटे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ मार्च-**

स्त्रियांच्या बलिदान , त्याग , समर्पण आणि समय सूचकतेमुळे घर, कुटुंब, समाज आणि राष्ट्राची उन्नती झाली आहे. स्त्रियांच्या बलिदानातून, योगदानातून या देशातील संस्कार आणि संस्कृती टिकून आहे . हे संस्कार आणि संस्कृती भविष्यात चिरकाल टिकवण्यासाठी महिला व मुलींनी परिश्रमपूर्वक प्रयत्न करावेत . यासाठी कुटुंबातील दुरावत आलेला संवाद सुसंवादात बदलावा असे मत कथाकार तथा पत्रकार राम तरटे यांनी व्यक्त केले.



अर्धापूर तालुक्यातील ऑक्सफर्ड इंग्लिश मिडियम स्कूल दाभड येथे महिला दिनानिम्मित पालक महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सौ. शालिनी सूर्यवंशी यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या सचिव ऋतिका सूर्यवंशी, वंदना लोखंडे, उपाध्यक्ष रामकृष्ण लोखंडे आदींची यावेळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य रवींद्र सूर्यवंशी यांनी केले.

सुप्रसिद्ध ग्रामीण कथाकार राम तरटे यांच्या कथाकथनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ग्रामीण भाषेतील दोन विनोदी कथा ' मुस्तापूरची खीर ' आणि ' बारा आण्याची बोंब ' या त्यांच्या ग्रामीण बोली भाषेतील कथांनी उपस्थित महिलांचा आनंद द्विगुणित झाला.

याचवेळी रोहिणी सावंत, पोलिस पाटील प्रतीक्षा सावळे या माता पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर ओमश्री अमेटवाड यांनी गीत सादर केले. शाळेच्या विद्यार्थिनी हर्षदा शिप्परकर, श्रध्दा अमेटवाड, अश्विनी कदम यांनी केलेल्या तडाखेबाज भाषणाने महिलांच्या टाळ्या मिळविल्या. कार्यक्रमात शिष्यवृत्ती परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी अंजली आठवले, श्रध्दा आमेटवाड, अश्विनी कदम, अक्षय पांचाळ, श्रीनिवास टेकाळे, श्रेयस बारसे,यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव भंडारे आणि सोनल गोमासे यांनी केले.

महिलांसाठी संगीत खुर्ची,बकेट बॉल,झटपट एक मिनिटात उखाणे स्पर्धा, झटपट फुगे फुगवून फोडण्याची स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते. स्नेहा जमदाडे, वर्षा कल्याणकर, वनिता राऊत, वैष्णवी सल्कमोडे, अश्विनी व्यवहारे, सपना कदम, वैशाली सावते, गायत्री कल्याणकर, शिल्पा रणिते, संगीता कल्याणकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विश्वनाथ जाधव, सतीश हुडे, शेख वाजिद यांनी परिश्रम घेतले.